



सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक



E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२२९ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ बुधवार दि. ९ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## हरियाणा जिंकलो आता महाराष्ट्रात मोठा विजय मिळवायचा आहे - नरेंद्र मोदी

### काँग्रेसचे सर्व षडयंत्र मतदारांनी उद्ध्वस्त केले

**विदर्भप्रजासत्ताक**
**दि.९ नवी दिल्ली**

हरियाणा आणि जम्मू-काश्मीरच्या निवडणुकांचा निकाल हाती आल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आज महाराष्ट्रातील जनतेशी संवाद साधला. महाराष्ट्रातील विविध प्रकल्पांचे व्हिडिओ कॉन्फरसिंगद्वारे उद्घाटन केले. यावेळी त्यांनी काँग्रेसवर टीका केली. तसंच, हरियाणा जिंकलो आता महाराष्ट्रात मोठा विजय मिळवायचा आहे, असं मोदी म्हणाले.




हरियाणाच्या निकालामुळे देशाचा मूड कळला आहे. दोनवेळा कार्यकाळ पूर्ण केल्यानंतर सलग तिसऱ्या वेळी जिंकून येणं ऐतिहासिक आहे. काँग्रेसची पूर्ण इकोसिस्टम, शहरी नक्षलवादी गँग लोकांना संभ्रमात टाकत आहे. काँग्रेसचे सर्व षडयंत्र उद्ध्वस्त झाले. दलितांमध्ये खोटं पसरवण्याचा प्रयत्न काँग्रेसने केला. पण दलित समाजाने त्यांच्या वाईट विचारांना दूर लोटलं. त्यांना जाणीव झाली की काँग्रेस त्यांचं आरक्षण काढून त्यांच्या वोट बँकेत देऊ इच्छित आहे. हरियाणातील दलित समाजाने भाजपाला रेकॉर्ड समर्थन दिलं आहे. ओबीसीही भाजपाबरोबर आहे, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले.

काँग्रेसने शेतकऱ्यांना भडकावलं, पण शेतकऱ्यांना माहिती आहे की त्यांच्या उत्पादनावर एमएसपी कोणी दिली? काँग्रेसने तरुणांना टार्गेट केलं आणि वेगवेगळ्या पद्धतीने भडकावण्याचा प्रयत्न केला. पण तरुणांनी त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी भाजपावरच विश्वास ठेवला. काँग्रेसने सर्व प्रयत्न केले. काँग्रेस नेहमीच फूट पाडा आणि सत्ता मिळवा यावर चालली आहे. काँग्रसेने सातत्याने सिद्ध केलंय की काँग्रेस बेजबाबदार पक्ष बनला आहे. देशात फूट पाडण्यासाठी ते नवनवे योजना आखत आहेत. समाजात फूट पाडण्याकरता ते फॉर्म्युला आणत असतात. काँग्रेसचा फॉर्म्युला स्वच्छ आहे की मुस्लिमांना भीती घाला, त्यांचं वोट बँकेत रुपांतर करा. काँग्रेसच्या एकाही नेत्याने म्हटलं नाही की मुस्लीमांमध्ये किती जाती असतात. मुस्लीम जातींची गोष्ट निघताच त्यांच्या तोंडावर कुलूप लागतं. पण हिंदूची गोष्ट निघते तेव्हा त्यांची चर्चा जातीवरूनच सुरू होते. काँग्रेसची नीती आहे. काँग्रेसला माहीत आहे की हिंदूत जितकी फूट होणार तेवढाच त्यांचा फायदा होणार. हिंदू समाजात आग लावण्याचा प्रयत्न काँग्रेसकडून केला जातोय, अशी टीकाही नरेंद्र मोदी यांनी केली.काँग्रेस ही द्वेष पसरवणारी मोठी फॅक्टरी बनणार आहे, असं स्वातंत्र्यानंतरच अनेक नेत्यांना कळलं होतं. त्यामुळे काँग्रेसला संपवलं पाहिजे असं खुद्द महात्मा गांधी म्हणाले होते. काँग्रेस स्वतःहून संपली नाही. पण ते देशाला संपवण्याचा प्रयत्न करत आहेत, असंही मोदी म्हणाले.

काँग्रेसच्या या प्रतयत्नांना महाराष्ट्रातील लोकांनी हरवलं पाहिजे. महाराष्ट्रातील लोकांनी भाजपा महायुतीसाठी मतदान करायचं आहे. हरियाणा तर भाजपा जिंकली, आता महाराष्ट्रात यापेक्षा मोठा विजय मिळवायचा आहे. गेल्या दहा वर्षांत आम्ही देशात विकास घडवण्याचा मोठा यज्ञ केला आहे, असंही पंतप्रधान नरेंद्र मोदींनी आवाहन केलं आहे.

## कोणीही स्वत:ला मोठा भाऊ समजू नये, हरियाणातील पराभवानंतर ठाकरेंच्या शिवसेनेची काँग्रेसवर शिरजोरी



**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ मुंबई**

कोणीही स्वतःला मोठा भाऊ किंवा छोटा भाऊ समजू नये, अशा शब्दांत शिवसेना (ठाकरे) खासदार संजय राऊत यांनी काँग्रेसला इशारा दिला आहे. तसेच, हरियाणा विधानसभा निवडणुकीच्या निकालाचा महाराष्ट्रावर कोणताही परिणाम होणार नाही, कारण इथे शरद पवार (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार या पक्षाचे प्रमुख) व उद्धव ठाकरे (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख) यांच्यासारखे जागृत नेते आहेत, असंही राऊत म्हणाले. संजय राऊत यांनी काही वेळापूर्वी मुंबईत प्रसारमाध्मांशी बातचीत केली. यावेळी ते म्हणाले, देशात काँग्रेसला स्वबळावर लढायचं असेल तर त्यांनी तशी जाहीर भूमिका घ्यावी. त्यांनी तशी भूमिका घेतली तर इतर पक्ष देखील त्यांच्या भूमिका घेतील.

संजय राऊत म्हणाले, ज्या राज्यात काँग्रेस कमकुवत असेत तिथे ते इतर प्रादेशिक पक्षांबरोबर आघाडी करून निवडणूक लढतात आणि ज्या राज्यात काँग्रेसला वाटतं की इथे आपण मजबूत आहोत, इथे आपली हवा आहे, तिथे ते इतर पक्षांना, आपल्या सहकाऱ्यांना दूर ठेवतात. त्यामुळे हरियाणासारखे निकाल लागतात. हरियाणाच्या निवडणुकीत इंडिया आघाडी म्हणून सामोरे गेलो असतो तर या निकालात बदल दिसला असता. इंडिया आघाडीला बहुमत मिळालं असतं. काँग्रेसच्या नऊ जागा कमी पडल्या. हा फार मोठा फरक नाही. अर्थात या निकालाने आम्ही निराश झालेलो नाही. परंतु, काँग्रेसला एक भूमिका घ्यावी लागेल.

## हरयाणातील काँग्रेस कार्यकर्त्यांना राहुल गांधींनी 'बब्बर शेर' म्हणत मानलेत आभार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ चंदीगड**

जम्मू-काश्मीर आणि हरयाणामध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांची प्रतिक्रिया समोर आली आहे. त्यांनी हरयाणातील काँग्रेस कार्यकर्त्यांना 'बब्बर शेर' म्हणत त्यांचे आभार मानले. तर, जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्ससोबत आघाडी करुन सत्ता मिळवल्याबाबत म्हणाले की, जम्मू-काश्मीरमधील जनतेचे मनापासून आभार. राज्यातील इंडिया आघाडीचा विजय हा संविधानाचा विजय आहे. हा लोकशाही स्वाभिमानाचा विजय आहे.



मीडियाशी संवाद साधताना राहुल गांधी म्हणाले, आम्ही हरयाणाच्या अनपेक्षित निकालाचे विश्लेषण करत आहोत. अनेक विधानसभा मतदारसंघातून येणाऱ्या तक्रारींबाबत आम्ही निवडणूक आयोगाला माहिती दिली आहे. हरयाणातील सर्व जनतेच्या पाठिंब्याबद्दल आणि आमच्या बब्बर शेर कार्यकर्त्यांचे मनापासून धन्यवाद. आम्ही हक्कांसाठी, सामाजिक आणि आर्थिक न्यायासाठी हा संघर्ष सुरूच ठेवू आणि सामान्यांचा आवाज उठवत राहू.

जम्मू-काश्मीरबद्दल बोलायचे झाल्यास, शेअक अब्दुल्ला घराण्याच्या नेतृत्वातील नॅशनल कॉन्फरन्स (छउ) हा जम्मू आणि काश्मीरमध्ये ४२ जागांसह सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला आहे. तर, काँग्रेसला ६ जागा मिळाल्या आहेत. जम्मू-काश्मीरच्या निवडणुकीत काँग्रेसची कामगिरी तितकीशी चांगली राहिली नाही. जम्मू भागात तर काँग्रेसला फक्त एक जागा मिळाली.

**काँग्रेस कमकुवत झाली?**

लोकसभा निवडणुकीनंतर काँग्रेस हरियाणातसरकार स्थापन करू शकते, असे मानले जात होते. परंतु निवडणुकीच्या निकालाने काँग्रेसच्या आशा मावळल्या आहेत. हरियाणातील पराभवानंतर महाराष्ट्र आणि झारखंडसारख्या राज्यांमध्ये मित्रपक्षांशी समन्वय साधण्यात काँग्रेसची स्थिती आता कमकुवत होऊ शकते. या दोन्ही राज्यांमध्ये नोव्हेंबरमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत.

## बाप-बेटे हल्ली दारोदारी फिरतात, दारावर टक-टक करुन...; आशिष शेलारांचे ठाकरे पिता-पुत्रांवर टीका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ मुंबई**

महाराष्ट्रात २०१९च्या विधानसभा निवडणुकांच्या नंतर वेगळा राजकीय प्रयोग झाला. काँग्रेस-राष्ट्रवादीने शिवसेनेशी महाविकास आघाडी केली आणि उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदी बसवले. अडीच वर्षांनी शिवसेनेत फूट पडल्याने मविआ सरकार कोसळले आणि ठाकरेंचे मुख्यमंत्रीपद गेले. आता २०२४च्या विधानसभा निवडणुका तोंडावर येऊन ठेपल्या असताना, मविआकडून मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार कोण असतील यावर राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत. ठाकरे गटाकडून



सातत्याने उद्धव ठाकरेंचे नाव पुढे केले जात आहे. पण काँग्रेस आणि शरद पवारांच्या राष्ट्रवादीकडून मात्र याबाबत निवडणुकीच्या निकालाची वाट पाहण्याचा सल्ला देण्यात आला आहे. या साऱ्या घटनांच्या नंतर भाजपाचे आमदार आशिष शेलार यांनी ठाकरे पिता-पुत्र उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांची खिल्ली उडवली.

आशिष शेलार यांनी आपल्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरून ठाकरे पिता-पुत्रांवर टीकास्त्र सोडले आहे. त्यांनी 'महाठगांचे गौरव गीत' या नावाची एक कविता पोस्ट केली असून त्यातून त्यांची खिल्ली उडवली आहे. बाप-बेटे हल्ली दारोदारी फिरतात, दारावर टक-टक करून मुख्यमंत्रीपद मागतात! आगे जाव.. आगे जाव.. आज नही कल; जाणते जण तर म्हणतात, चल हट निघ चल! कटोरा घेऊन दोघे भाषणबाजी करतात, उगाच मोदी-शहांना ठग म्हणून लक्ष लोकांचे वेधतात! कटकमिशन ज्यांनी कोविडमधे बॉडी बॅगचे खाल्ले, महाठग तर महाराष्ट्राचे हेच होते ना ठरले? अशा शब्दांत आशिष शेलारांनी ठाकरे गटावर टीका केली.

लोकसभा निवडणुकीनंतर साऱ्यांनाच विधानसभा निवडणुकीचे वेध लागले होते. मधल्या वेळेत महाविकास आघाडीकडून बैठकांचे सत्र सुरुच होते. दोन महिन्यांपूर्वी ठाकरे गटाचे उद्धव ठाकरे दिल्लीत गेले होते. तेथे ते काही दिवस वास्तव्यास होते. त्यावरून भाजपा आणि महायुतीने त्यांच्यावर टीका केली होती. ठाकरे दिल्लीत गांधी परिवाराशी भेट घेऊन मविआचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करण्याची विनंती करायला गेल्याचे भाजपाने म्हटले होते. तसेच शरद पवारांशी सातत्याने झालेल्या बैठकीतही ठाकरे गटाने मविआचा मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करण्याबाबतच जोर दिल्याचा दावा महायुतीने केला होता. त्यावरून अनेकदा महायुतीकडून ठाकरेंना लक्ष्य केले आहे.

## शोशल मीडियावर व्हायरल झालेल्या यादीत आमदार रवी राणा भाजपचे समन्वयक? पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते प्रचंड अस्वस्थ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

विधानसभा निवडणुकीचा बिगुल वाजायला काही दिवसांचा अवधी राहिला आहे. पण, राज्यातील महाविकास आघाडी आणि महायुतीत जागावाटपाचा पेच कायम आहे. दुसरीकडे, मंगळवारी महायुतीतील तीनही पक्ष आणि घटकपक्षांमध्ये समन्वयासाठी सर्व २८८ विधानसभा मतदारसंघांमध्ये समन्वयांची नियुक्ती करण्यात आली. त्यात बडनेरा मतदारसंघासाठी भाजपतर्फे आमदार रवी राणा यांचे नाव समन्वयक म्हणून समोर आल्याने भाजपच्या स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांना चांगलाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.आज दुपारी शोशल मीडियावर हि यादी व्हायरल झाली आहे

ज्यांनी भाजपमध्ये प्रवेश केलेला नाही, त्यांचे नाव बडनेरा मतदारसंघासाठी समन्वयक म्हणून प्रसिद्ध केले जाणे हे भाजपच्या



कार्यकर्त्यांसाठी धक्कादायक आहे. पक्षाचे कार्यकर्ते त्यामुळे प्रचंड अस्वस्थ झाले आहेत. यासंदर्भात आपण पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांसोबत बोलू. रवी राणा जर भाजपचे समन्वयक असतील, तर त्यांनी उद्यापासून त्यांच्या कार्यालयावर भाजपचा झेंडा आणि कमळ चिन्ह लावावे आणि भाजपचा प्रचार सुरू करावा, अशी प्रतिक्रिया भाजपचे प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांनी दिली आहे.

दुसरीकडे, अमरावती मतदारसंघाचे शिवसेना शिंदे गटाचे समन्वयक म्हणून भाजपचे नेते व माजी राज्यमंत्री जगदीश गुप्ता यांचे नाव प्रसिद्ध झाल्यानेही अनेकांनी आश्चर्य व्यक्त केले आहे.मात्र शोशल मीडियावर व्हायरल झालेली हि यादी कितपत खरी आहे हे सुद्धा बघण्यासारखे आहे मात्र बडनेरा मतदारसंघासाठी भाजपतर्फे आमदार रवी राणा यांचे नाव समन्वयक म्हणून खरोखरच जाहीर झाले असेल तर पदाधिकारी व कार्यकर्ते काय भूमिका घेणार या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## खा.अनिल बोंडे यांच्या पत्राला दाखविली केराची टोपली : प्रादेशिक परिवहन विभागाची कार्यवाहीत शिथिलता : देवाण घेवाण केल्याचीही चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९नांदगाव पेठ**

रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पातील केमिकलयुक्त राख वाहून नेणारे ट्रक ओव्हरलोड वाहतूक करत असल्याची तसेच धावत्या वाहनांमधून राख उडत असल्याने नागरिकांच्या डोळ्यात ती राख शिरून अपघात होण्याची शक्यता असल्याने वाहनांवर कार्यवाही करण्याचीमागणी खा.डॉ. अनिल बोंडे यांनी प्रादेशिक परिवहन विभागाकडे केली होती मात्र प्रादेशिक परिवहन विभागाने एक दिवस वाहनांवर कार्यवाही करून नंतर मात्र खा. बोंडे यांच्या पत्राला केराची टोपली दाखवत कार्यवाही शिथिल करण्याचा प्रकार प्रादेशिक परिवहन विभागाने केला आहे.



रतन इंडिया ऊर्जा प्रकल्पामधील तयार होणारी राख दररोज चारशे ते पाचशे ट्रक मधून वाहतूक केल्या जाते. अनेकवेळा ट्रकमधून ओव्हरलोड वाहतूक होत असल्याचा प्रकार सुद्धा माध्यमांनी उघड केला होता मात्र याप्रकरणी खुद्द खा.डॉ.अनिल बोंडे यांनी दखल घेतल्यानंतर त्यांनी ४ ऑक्टोबर रोजी पत्र क्र.व्हीआयपी १०१२३ अन्वये प्रादेशिक परिवहन विभागाला वाहनांवर कार्यवाही करण्याची मागणी केली होती. प्रादेशिक परिवहन विभागाने एक दिवस वाहनांवर कार्यवाही केली मात्र नंतर लगेच दुसऱ्या दिवशी कार्यवाही शिथिल करण्यात आली. कार्यवाही शिथिल करण्याचे नेमके कारण काय असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.यामध्ये खूप मोठी देवाणघेवाण झाल्याची सुद्धा आल्याची चर्चा आहे.मात्र खा. बोंडे यांनी पत्रामधून प्रकरणाची भीषणता व्यक्त केल्यानंतर सुद्धा विभागाने याप्रकरणी गंभीर नसणे व कार्यवाही मध्येच सोडून देणे याचाच अर्थ दाल मे कुछ काला है.विशेष म्हणजे ज्या ठिकाणाहून राख भरली जाते तेथुनच कार्यवाही होणे आवश्यक असतांना रतन इंडियाची हुजरेगिरी करणारे प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी मात्र वाहतूक करणाऱ्या वाहनांवर रस्त्यात कार्यवाही करत होते.रतन इंडियाला पत्र देऊन नियमानुसार राख भरण्याचे आदेश दिले तर ओव्हरलोड वाहतूक होणार नाही असे वाहनमालकांचे म्हणणे आहे परंतु त्यांच्याकडे एवढी व्यवस्था नाही असे प्रादेशिक परिवहन विभागाचे अधिकारी सांगतात यावरून केवळ टोलवाटोलवी करण्याचे व खिसे गरम करण्याचे काम होत असल्याचे सिद्ध होते.

## संपादकीय ......

# दोन राज्ये, दोन निकाल

भारतीय मतदार सुज्ञ असून, त्याचे मन व मत जाणणे किती अवघड, याची प्रचिती जम्मू-काश्मीर व हरियाणा विधानसभा निवडणुकांच्या निमिताने पुन्हा एकदा आली. यापूर्वी लोकसभा निवडणुकीच्या वेळीही जनमत चाचण्या वा एक्झिट पोलचे अंदाज सपशेल खोटे ठरले होते. यावेळीही हरियाणा व जम्मू-काश्मीरमध्ये मतदारांनी इंडिया आघाडीला कौल दिला असल्याचे मतदानोत्तर चाचण्यांमधून दिसून आले होते. हरियाणात काँग्रेसला स्पष्ट बहुमत मिळेल, असा अंदाज वर्तवला होता. प्रत्यक्षात हरियाणात भाजपने बाजी मारत आश्चर्याचा धक्का दिला. जम्मू-काश्मीर विधानसभेत नॅशनल कॉन्फरन्स-काँग्रेस इंडिया आघाडीतील पक्षांना यश मिळेल, असे मतदानोत्तर चाचण्यांनी म्हटले होते. काहींनी तर जम्मू-काश्मीरमध्ये त्रिशंकू विधानसभा अस्तित्वात येण्याची शक्यता दिसत आहे, असे म्हटले होते. प्रत्यक्षात नॅशनल कॉन्फरन्सला अपेक्षेपेक्षा अधिक जागा मिळाल्या. ३७०वे कलम रद्द झाल्यानंरच्या या पहिल्याच निवडणुका होत्या आणि त्यामुळे जनतेत अभूतपूर्व उत्साह होता. मतदारसंघांची पुनर्रचनाही झाली असून त्यामुळे जम्मूतील मतदारसंघ वाढले. २०१४ मध्ये या राज्यात मेहबुबा मुफ्ती यांचा पीडीपी हा पक्ष २८ जागा मिळवून सर्वात मोठा पक्ष ठरला होता. त्यावेळी भाजपला २५ जागा मिळाल्या होत्या आणि दोघांनी मिळून सरकार स्थापन केले होते. या राज्यात ५ ऑगस्ट २०१९ रोजी घटनात्मक बदल करण्यात येऊन जम्मू-काश्मीर व लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश करण्यात आले. तसेच ३७०वे कलम रद्द करण्यात आले.

जम्मू-काश्मीर पुनर्रचना कायद्यात २०२३ मध्ये दुरुस्ती केली आणि नायब राज्यपालांना विधानसभेवर पाच सदस्यांची नेमणूक करण्याचा हक्क बहाल केला. हे पाचही सदस्य भाजपचे असतील. याचा अर्थ, बहुमतासाठी आकडा कमी असल्यास, या तरतुदीचा भाजपला फायदा झाला असता. जम्मू-काश्मीर सीमावर्ती राज्य असल्याने तेथे लोकशाही प्रक्रिया सुरळीत होण्याच्या दृष्टीने या निवडणुकीस महत्त्व होते. जम्मू-काश्मीरचे रूपांतर केंद्रशासित प्रदेशात केल्याबद्दल तेथे असंतोषही होता. अर्थात ३७०वे कलम रद्द झाल्यामुळे देशात सर्वत्र समाधानाची भावना आहे; मात्र हे कलम पुन्हा एकदा लागू करण्याची भाषा 'नॅकॉ'ने केली असून, काँग्रेसने त्याबाबत सोयीस्कर मौन स्वीकारले आहे. खरे तर, ३७०वे कलम हटवल्यानंतर जम्मू-काश्मीरमधील दहशतावादाच्या घटना कमी झाल्या होत्या आणि तेथील गुंतवणूकही वाढू लागली असली, तरी काश्मिरी पंडितांचे पुनर्वसन अद्याप झालेले नाही. या निवडणुकीत जम्मूमधील भाजपची ताकद वाढली असून, खोर्‍यात मात्र भाजपचे तसे अस्तित्व नाही. या उलट 'नॅकॉ-काँग्रेस' आघाडीने मात्र प्रतिकूल परिस्थिती असूनही जबरदस्त यश मिळवले. अब्दुल्लांच्या घराणेशाहीवर भाजपने तोंडसुख घेत त्यांच्या राष्ट्रप्रेमावरही शंका उपस्थित केल्या; पण हा पक्ष स्थानिकांमध्ये रुजलेला असून, 'काश्मिरियत' नावाची गोष्ट शिल्लक आहे, हे नाकारता येणार नाही. हरियाणात सलग तिसर्‍यांदा यश मिळवून भाजपने कमाल करून दाखवली. वास्तविक किसान, जवान आणि पहेलवान या तीन घटकांनी निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे सांगण्यात येत होते. शेतकरी आंदोलनास हरियाणातून मोठाच पाठिंबा मिळाला होता आणि म्हणूनच लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला तेथे चांगलेच यश मिळाले. राज्यातून लष्करात भरती होणार्‍यांची संख्या मोठी असून, 'अग्निवीर' योजनेबाबतही तेथे नाराजी होती. महिला कुस्तीगिरांच्या आंदोलनाचेही तीव्र पडसाद उमटले. हरियाणा ही कुस्तीगिरांची भूमी असून कुस्तीगिरांमधील असंतोषाचा फायदा घेण्यासाठी काँग्रसने विनेश फोगाटला संधी दिली. यावेळी लोकसभेतील यश काँग्रेसला टिकवता आले नाही. भाजपने मुख्यमंत्री मनोहरलाल खट्टर यांना बदलून नायाबसिंग सैनी यांना त्या जागी बसवले.

अनेक विद्यमान आमदारांची तिकिटे कापली. शेतकरी तसेच जाट समाजातील नाराजी दूर करण्यासाठी पावले उचलली. एवढेच नव्हे, तर राम-रहीमला पॅरोलवर सोडून भाजपला मतदान करण्याचे आवाहन त्याच्यामार्फत भक्तांना करण्यात आले. उलट काँग्रेस मात्र भुपेंद्र हुड्डा यांच्यावर पूर्णतः विसंबली. त्यांच्याच कलाने तिकिटे देण्यात आली. हुड्डा आणि प्रदेशाध्यक्ष कुमारी शैलजा यांचा संघर्ष टोकाला गेला होता. काँग्रेसला दलितांचे प्रेम असेल, तर त्यांना शैलजा यांचे नाव मुख्यमंत्रिपदासाठी घोषित करावे, असे सुचवून भाजपने काँग्रेसमधील संघर्षाचा लाभ उठवला. आता या दोन राज्यांच्या निवडणूक निकालात दोन राष्ट्रीय पक्षांमध्ये भाजपच सरस ठरला. या निवडणुकांमुळे महाराष्ट्रातील महायुतीच्या कार्यकर्त्यांचे मनोधैर्य वाढणार असून, राज्यात परिवर्तन अटळ आहे, या भ्रमात महाविकास आघाडीला राहता येणार नाही. भाजप वा काँग्रेससारखे राष्ट्रीय पक्ष असोत वा प्रादेशिक पक्ष, जनता प्रत्येकाला जोखत असते, हे लक्षात ठेवा, असे या दोन राज्यांच्या दोन निकालांनी स्पष्टपणे सांगितले. लोकशाही व्यवस्थेची पाळेमुळे किती खोलवर रुजली आहेत, याचा दाखला देणारे हे निकाल एकीकडे प्रादेशिक अस्मितांचा आणि आशा-आकांक्षांचा सन्मान राखतात आणि दुसरीकडे भाजपसारख्या राष्ट्रीय पक्षावर जनतेचा विश्वास दृढ होत असल्याचा अर्थही व्यक्त करतात.

# हुरड्यासाठी ज्वारीचे प्रसिद्ध वाण कोणते? वाचा सविस्तर

**दि.९ विदर्भ प्रजासत्ताक**

पारंपारिकपणे, मराठवाड्यात रब्बी हंगामात हुरडा ज्वारीचीपेरणी केली जाते. हुरडा आणि हिरवा चारा विकून शेतकरी मोठ्या प्रमाणात नफा मिळवू शकतात.




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

जनावरांची हिरव्या चाऱ्याची गरज पूर्ण करण्यासाठी कृषी पर्यटन, कुटुंब, मित्रमंडळी यांना अल्प भेटीसाठी या हुरड्याचे खास आकर्षण आहे.

ज्वारीचेपीक वाढण्याच्या एका टप्प्यात हुरड्यावर येते. सुरुवातीचा काळ जेव्हा ज्वारीचे दाणे रसाळ आणि खूप मऊ असते, अशी कणसे कापून गोवऱ्यांच्या आरात भाजली जातात किंवा दाणे हाताने चोळून तव्यावर किंवा पातेल्यात भाजली जातात.

हुरडा ज्वारीचे महत्व

१) हुरड्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या वाणांच्या बीजोत्पादनातून शेतकऱ्यांना चांगला आर्थिक नफा होऊ शकतो.

२) ज्वारीमध्ये खनिज आणि तंतुमय पदार्थाचे प्रमाण अधिक असून, त्यामध्ये असणाऱ्या स्टार्चचे विघटन हळूवारपणे होत असल्यामुळे त्यांचा उपयोग मधुमेह आणि शरीराची स्थुलता कमी करण्यासाठी होतो.

हुरड्याचे सुधारित वाण

१) परभणी वसंत

– वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापिठाने विकसित केलेला वाण.

– हुरडा रूचकर आणि दाणे, मऊ गोड असून, हुरड्याची प्रत उत्तम.

– कणसातून दाणे सहजरीत्या वेगळे होतात, खडखड्या रोगास माध्यम प्रतिकारक्षम.

– प्रति हेक्टरी ३२-३५ क्विंटल हुरडा आणि १३०-१३२ क्विंटल हिरव्या चाऱ्याचे उत्पादन.

२) फुले मधुर

– महात्मा फुले कृषी विद्यापिठाने विकसित केलेला वाण पश्चिम महाराष्ट्रात रब्बी हंगामात हुरडा लागवडीसाठी प्रसारित.

– हुरडा गोड व रूचकर असून, दाणे कणसापासून सहजरित्या वेगळे होतात.

– हा वाण अवर्षणप्रवण स्थितीत लागवड करण्यासाठी योग्य.

– खोडमाशी, खोडकिडा व खडखड्या रोगास प्रतिकारक्षम.

– हेक्टरी ३० ते ३२ क्विंटल हुरडा आणि १२० ते १२५ क्विंटल हिरव्या चाऱ्याचे उत्पादन.

इतर स्थानिक वाण

सुरती, गुळभेंडी, कुची, काळी दगडी, हुरड्यासाठी उपलब्ध आहेत.




# नवरात्रीत अनवाणी चालण्याने खरंच लाभ होतो का? वाचा धार्मिक आणि शास्त्रीय कारण!

**दि.९ विदर्भ प्रजसत्ताक**

यंदा ३ ऑक्टोबरपासून शारदीय नवरात्र सुरू झाली आहे. उपासनेचा एक भाग म्हणून अनेक जण नवरात्रीत अनवाणी चालताना दिसतात. त्यामागे नेमका काय भाव असावा आणि त्याचे फायदे तोटे काय? शिवाय शास्त्रीय आधार काय तेही जाणून घेऊया.

अनवाणी चालण्यामागे धार्मिक आणि वैज्ञानिक कारणे आहेत. कोणत्याही धार्मिक स्थळी जाताना आपण चपला बाहेर काढून ठेवतो. चपलेबरोबर मनाला चिकटलेले विकारही मंदिराच्या पायरीशी ठेवून मंदिरात प्रवेश करणे, हा त्यामागचा मुख्य हेतू असतो. शिवाय, आपल्यामुळे स्वच्छ परिसर घाण होऊ नये, ही देखील सद्भावना असते. तसेच, तिथल्या वातावरणाशी समरस होताना अनवाणी चालल्याचा खूप फायदा होतो.

आपल्या पायाचे तळवे अतिशय संवेदनशील असतात. संपूर्ण देहाचे अ‍ॅक्युपंक्चर पॉईंटस पायाच्या तळव्यात असतात. अनवाणी चालल्यामुळे जमिनीची विद्युत शक्ती पायाच्या तळव्यातून शरीरात शिरकाव करते. रक्त संक्रमण सुधारते. अनेक प्रकारच्या आजारातून सुटका होते. उच्च रक्तदाब कमी होतो. तणाव दूर होतो. डोकेदुखी कमी होते. उत्साह वाढतो. हृदयविकाराची शक्यता कमी होते. वजन नियंत्रणात राहते आणि हाडे मजबूत होतात. म्हणून डॉक्टरदेखील आपल्या रुग्णांना रोज पंधरा मिनीटे बागेत, मैदानी परिसरात अनवाणी चालण्याचा सल्ला देतात. त्यामुळे केवळ नवरात्रीतच नाही, तर दररोज दिवसातील काही वेळ तरी अनवाणी चालणे हितावह ठरते.

...मग नवरात्रीत अनवाणी चालण्याची प्रथा कधी सुरू झाली?

ही प्रथा नेमकी कधी सुरू झाली ते माहित नाही, मात्र कशी सुरू झाली असेल, हा तर्क आपण नक्कीच लावू शकतो. नवरात्रीत आपण घटस्थापना करतो. घटाभोवती मातीचा ओटा तयार करून त्यात धान्याची रुजवण घालतो. एकार्थी मातीच्या आणि पर्यायाने निसर्गाच्या संपर्कात येतो. मातीशी नाळ जोडली जावी आणि मातीशी आपला ऋणानुबंध कायम राहावा, या हेतून भाविक नवरात्रीत वहाणा घालत नाहीत.




नवरात्रीत नऊ दिवस भाविक, कांदा-लसूण खात नाहीत, मांसाहार करत नाहीत, एकभुक्त राहतात, फलाहार करतात. या गोष्टी शारीरिकदृष्ट्या फायदेशीर असतातच, शिवाय भावनिकदृष्ट्या देखील त्यागाचे महत्त्व शिकवतात. अनवाणी चालण्याचा पर्यायही त्याचाच एक भाग. स्वत:च्या शरीराला थोडेफार कष्ट देऊन ईश्वरी चिंतन मनात ठेवणे, हा त्यामागचा मूळ विचार आहे. उत्सव हे चांगल्या कार्याची सुरुवात करण्याचे निमित्त असते. त्या मुहूर्तावर चांगल्या सवयी लावून घ्याव्या, चांगल्या कार्याचा शुभारंभ करावा, चांगल्या कामासाठी योगदान देता यावे, हा शुद्ध हेतू असतो.परंतु, अलीकडे विचार लक्षात न घेता केवळ ट्रेंड म्हणून अनेक गोष्टी केल्या जातात. कुणी विचारले, तर त्यामागचे कारणही सांगता येत नाही. त्यामुळे व्यक्तीचे हसे होतेच, परंतु धर्म संस्कृतीवर देखील प्रश्नचिन्ह उभे केले जाते. म्हणून एखाद्या गोष्टीचे अनुसरण करायचे असेल, तर आधी त्याची संपूर्ण माहिती करून घ्यावी आणि मगच त्यानुसार कृती करावी.

# दूध पूर्णान्न म्हणून उपवासाला फक्त दूधच पिताय?

## थांबा, डॉक्टर सांगतात, अशी चूक पडेल महागात...

**दि.९विदर्भ प्रजासत्ताक**

सध्या बऱ्याचजणांचे नवरात्रीचे उपवास सुरु आहेत. काहीजण संपूर्ण नऊ दिवस उपवास करतात तर काही फक्त पहिल्या आणि शेवटच्या दिवशी उपवास करतात. उपवास म्हटलं की आपल्याला काही मोजकेच पदार्थ खाता येतात. यामुळे या उपवासाच्या नऊ दिवसात आपल्या खाण्यावर खूप बंधन येतात. उपवासाला शक्यतो आपण दूध, फळं, ड्रायफ्रुटस, फराळाचे पदार्थ असे काही ठराविकच पदार्थ खातो. आपल्यापैकी काहीजण असे असतात जे संपूर्ण नऊ दिवस फक्त लिक्विड पिण्यावरच अधिक भर देतात. यात फळांचे ज्यूस, दही, ताक, दूध असे द्रव पदार्थ पिऊनच उपवास करतात. यातही काहीजणांचा असा समज असतो की दूध हे पूर्णान्न आहे, त्यामुळे उपवासाचे संपूर्ण नऊ दिवस फक्त दूध प्यायले तरी चालते.

दुधातून आपल्या शरीराला आवश्यक ती पोषक तत्व मिळतात, पण म्हणून उपवासाला काही न खाता फक्त दूध पिणे हे कितपत योग्य आहे? याचबरोबर उपवासाला काही न खाता फक्त दूध प्यायल्याने त्याचे आपल्या आरोग्यावर कोणते परिणाम होतात याबद्दल पोषणतज्ज्ञ डॉ. प्रियंका रोहतगी यांनी अधिक माहिती दिली आहे. उपवासाला फक्त दूध पिणे योग्य की अयोग्य याबद्दल त्या नेमकं काय सांगतात ते पाहूयात.

दूध हे खरंतर पूर्णान्न आहे. दुधातून आपल्या शरीराला आवश्यक ती संपूर्ण पोषक तत्व मिळतात. दुधातील याच महत्वपूर्ण गुणधर्मामुळे लहान बाळाला किमान पहिले ६ महिने तरी फक्त आईचेच दूध पिण्याचा सल्ला दिला जातो. असे असले तरी आईचे दूध आणि गाई म्हशीचे दूध यात फार मोठा फरक असतो. याचप्रमाणे आपण जसजसे वयाने मोठे होत जातो तसतसे आपल्या पोटात लाखो बॅक्टेरिया – जीवाणू वाढतात ज्यामुळे आपल्या पोटात एक प्रकारचे वातावरण तयार होते. पोटातील या वातावरणाच्या मदतीने आपण जे काही अन्न खातो ते पचवले जाते.

.आपल्या पोटात असणारे हे जीवाणू आपल्याला अन्न पचवण्यास मदत करतात. त्यामुळे मानवी पोट हळूहळू त्याची वेगळी अवस्था प्राप्त करून त्यानुसार अन्नाचे पचन करते. बाल्यावस्थेनंतर पोटात अनेक बदल होतात आणि दुधाशिवाय इतर अनेक प्रकारचे अन्न पचवण्याची क्षमता विकसित होते. या स्थितीत जर आपण फक्त दूध पिऊन काही दिवस राहायचे ठरवले तर ते शक्य होत नाही. यासोबतच, आपले शरीर निरोगी राहावे म्हणून सगळ्या प्रकारचे पदार्थ खाणे गरजेचे असते. आपल्या निरोगी शरीरासाठी सगळ्या प्रकारचे पोषक घटक मिळणे आवश्यक असते. यामुळेच उपवासाला फक्त दूध पिणेच पुरेसे नसते. जर आपण उपवासाचे नऊ दिवस फक्त दूध पिऊन राहायचे ठरवले तर आपले आरोग्य बिघडून आपण आजारी पडू शकतो. आपल्यापैकी काहीजण असे असतात जे संपूर्ण नऊ दिवस फक्त लिक्विड पिण्यावरच अधिक भर देतात. यात फळांचे ज्यूस, दही, ताक, दूध असे द्रव पदार्थ पिऊनच उपवास करतात. काहीजण उपवासाला फक्त दूध पिणेच पसंत करतात. परंतु डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार हे चुकीचे आहे. उपवासाला काहीही न खाता फक्त दूध प्यायल्याने दुधातील लॅक्टोजचे प्रमाण आपल्या शरीरात वाढते. दुधातील लॅक्टोज आपल्या आतड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर साठून राहते. यामुळे आपल्या आतड्यातील चांगले बॅक्टेरिया मारले जातात.काहीजण उपवासाला फक्त दूध पिणेच पसंत करतात. परंतु डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार हे चुकीचे आहे. उपवासाला काहीही न खाता फक्त दूध प्यायल्याने दुधातील लॅक्टोजचे प्रमाण आपल्या शरीरात वाढते. दुधातील लॅक्टोज आपल्या आतड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर साठून राहते. यामुळे आपल्या आतड्यातील चांगले बॅक्टेरिया मारले जातात.



आपल्या शरीरातील चांगल्या बॅक्टेरियाचे प्रमाण कमी झाल्याने आपोआप वाईट बॅक्टेरियाचे प्रमाण वाढू लागेल, यामुळे आपल्या आतड्यांचे आरोग्य खराब होते. अशा स्थितीत आपल्याला लूज मोशन, गॅस, अपचन, डोकेदुखी, पोट फुगणे यासारख्या शारीरिक समस्या त्रास देऊ शकतात. आजकाल अनेकजण वजन कमी करण्यासाठी काही दिवस फक्त दूध पिण्याचा सल्ला देतात, पण ही पद्धत पूर्णपणे चुकीची आहे. यामुळे रोगप्रतिकारकशक्ती कमकुवत होईल आणि तुम्हाला अनेक आजारांचा सामना करावा लागू शकतो.

# झेडपीच्या पुढाकारातून शिष्यवृत्तीसाठी 'मिशन हंड्रेड'

## सीईओंचा पुढाकार : शाळांमध्ये पूर्वतयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती** :जिल्हा परिषदेसह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शाळांमधील अनेक विद्यार्थ्यांमधून हुशार विद्यार्थी निवडून शिष्यवृत्ती परीक्षेचे त्यांना मार्गदर्शन देण्यात येणार आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेने 'मिशन हंड्रेड' आखले आहे.

विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन मिळत नसल्यामुळे ते दखलनीय कामगिरी करू शकत नाहीत. मात्र, योग्य मार्गदर्शन मिळाल्यास ते गरुडझेड घेऊ शकतात.

ही बाब लक्षात घेता, आता जिल्ह्यातील १४ तालुक्यामधील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील इयत्ता पाचवी व आठवीचे प्रत्येकी १०० विद्यार्थी निवडून त्यांना शासनाच्या शिष्यवृत्ती योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सीईओ संजिता महापात्र यांनी पुढाकार घेतला आहे. या अनुषंगाने शासनाच्या विविध शिष्यवृत्तीचा लाभ मिळवून देण्याच्या अनुषंगाने प्रयत्न केले जाणार आहे. याकरिता




शिक्षकांवर जबाबदारी सोपवून शाळा सुटल्यानंतर अतिरिक्त वर्ग घेण्याच्या सूचना दितल्या आहेत. प्रत्येक तालुक्यातील ८ ते १० विद्यार्थी निवडून त्यांना शिष्यवृत्तीचा अभ्यास व नवोदय विद्यालयाची परीक्षा कशी यशस्वी करावी, याबाबत अतिरिक्त प्रशिक्षण दिले जाणार आहे.

त्याकरिता शाळा सुटल्यानंतर किंवा सुटीच्या दिवशी अतिरिक्त वर्ग घेतले जाणार आहेत. केंद्रप्रमुखांना सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार लवकरच या अभिनव उपक्रमाची जिल्हा परिषदेमार्फत अंमलबजावणी केली जाणार आहे.

शिक्षण घेत असलेल्या इयत्ता पाचवी आणि आठवीमधील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीसाठी प्रत्येक तालुक्यातून प्रत्येकी मिशन हंड्रेड राबविण्यात येणार आहे.-

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

बुधवार दि. ९ ऑक्टोबर २०२४ शहर/ग्रामिण


# ‘काँग्रेसने जिलेब्या तळल्या मात्र जनतेने त्यात पाक भरला नाही’

## हरियाणातील पराभवावरुन डॉ.अनिल बोंडेंचे काँग्रेसवर टीकास्त्र

### मोर्शी मध्ये भाजप पदाधिकाऱ्यांकडून अभूतपूर्व जल्लोष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ मोर्शी :** प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत हरियाणातील जनतेने तिसऱ्यांदा राज्याची सूत्र ही भाजपच्या हातात दिली आहेत. आताताई काँग्रेसनं विजयापूर्वी जिलेब्या तळल्या होत्या, मात्र जनतेने त्यात पाक भरला नाही अशी टीका देखील भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.अनिल बोंडे यांनी केली आहे. बोंडे यांच्या नेतृत्वात हरियाणातील भाजपच्या अभूतपूर्व विजयाचा जल्लोष मंगळवारी (ता.८) भाजपा तर्फे येथील जयस्तंभ चौकात करण्यात आला. दरम्यान भाजप पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी फटाके उडवत, मिठाई भरवत आनंदोत्सव साजरा केला.हरियाणा विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पार्टीने तिसऱ्यांदा अभूतपूर्व विजय मिळवला. त्यानिमित्त राज्यसभा खासदार तथा भाजपा नेते अनिल बोंडे यांच्या नेतृत्वाखाली मोर्शीच्या जयस्तंभ चौकात भारतीय जनता पार्टीने मोठा विजयोत्सव साजरा केला. फटाके, गुलालांची उधळण ढोल ताशांची आतषबाजी करत भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी नृत्यावर थीरकत हा आनंदोत्सव साजरा केला. हरियाणा तो झाकी है, महाराष्ट्र अभी बाकी है अशा गगनभेदी घोषणा यावेळी देण्यात आल्या. दरम्यान बोलताना अनिल बोंडे म्हणाले, हरियाणात भाजपचा दणदणीत



विजय झाला. ४९ जागांवर भाजपने आघाडी घेतली. तिसऱ्यांदा येथे भाजपचे सरकार स्थापन झालं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावर हरियाणातील जनतेने विश्वास ठेवला. त्यामुळे आता न भूतो न भविष्यती येथील विकास झाल्याशिवाय राहणार नाही. यावेळी डॉ. वसुधा बोंडे, अर्चना मुरुमकर, अमित कुबडे, भाजपचे तालुकाध्यक्ष निलेश शिरभाते, दत्ता गेडाम, राहुल चौधरी, रवी मेटकर, अजय आगरकर, अशोक देशमुख, राजेश्वर निस्ताने, नितिन उमाळे, हर्षल चौधरी, मनोज मोकळकर, आप्पा गेडाम, हरीविजय गेडाम, रावसाहेब अढ़ाऊ, नितिन चिखले, बाबाराव जाधव, उमेश जवंजाळ अनिता लांजेवार, प्रतिभा राऊत, विद्या गेडाम, संगीता तायडे, माया वानखडे, माया बसुंदे, भारती महाजन, सुनिल ढोले, ज्योती मालवीय यांच्यासह भाजपचे इतर पदाधिकारी या विजयी जल्लोषात सहभागी झाले होते.

#### वरुड–मोर्शीत कमळ फुलेल :

डॉ.अनिल बोंडेभाजपने जयस्तंभ चौकात मोठा जल्लोष साजरा केला. हरियाणातील विजयाचा महाराष्ट्रात आनंद साजरा होत आहे. हरियाणात जे झालं तेच महाराष्ट्रात होईल. कमळाचा विजय होईल. अस म्हणत डॉ. अनिल बोंडे यांनी वरुड–मोर्शी विधानसभा क्षेत्रातही कमळ फुलनार असल्याचेही जाहीर केले.

# हरियाणासारखंच महाराष्ट्रात वनसाईड बहुमत मिळणार

## नवनीत राणांना फुल कॉन्फिडन्स

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** हरियाणासारखंच महाराष्ट्रात भाजप आणि महायुतीला वनसाईड बहुमत मिळणार असल्याचा फुल कॉन्फिडन्स माजी खासदार नवनीत राणा यांनी व्यक्त केलायं. दरम्यान, जम्मू काश्मीर आणि हरियाणात विधानसभा निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांचे आज निकाल जाहीर झाले आहेत. जम्मू काश्मीरात नॅशनल कॉन्फरन्सची सत्ता तर हरियाणात भाजपचे आपली सत्ता काय राखलीयं. या निकालांवर बोलताना राणा यांनी महाराष्ट्रातही हेच चित्र राहणार असल्याची भूमिका मांडलीयं.



नवनीत राणा म्हणाल्या, आज हरियाणाचा निकाल जो लागलायं आहे. या निकालामध्ये भाजपने बहुमताने लीड घेतला आहे. अनेक लोकं म्हणत होते की भाजपला एवढ्या तेवढ्या जागा मिळतील, असा दावा करीत होते बरेच अजेंडे सांगत होते. भाजपला विरोध आहे, असंही विरोधक सांगत होते, पण जो काम करेल त्याच्या पाठीशी हरियाणाची जनता राहणार असल्याचं जनतेने दाखवून दिलंय. हरयाणासारखीच महाराष्ट्राची जनताही वनसाईड बहुमत भाजप महायुतीला देणार असल्याचं नवनीत राणा यांनी स्पष्ट केलंय.

हरियाणाचा विजय हा पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शाहा यांच्या विकासकामांमुळेच झाला आहे. हरियाणाच्या जनतेला माहिती आहे, की विकासकामे करणारं सरकार कोणतं आहे, त्यामुळेच हरयाणाच्या जनतेने विकास करणाऱ्याच सरकारला निवडून दिलंय. हरियाणाच्या विजयाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मंत्री अमित शाहा यांचं अभिनंदन नवनीत राणा यांनी यावेळी केलंय.

हरियाणामध्ये भाजपला ४९ जागांवर विजय मिळाला आहे तर दुसरीकडे काँग्रेसला ३६ जागांवर विजय मिळाला आहे. हरियाणामध्ये पुन्हा एकदा भाजपने सत्ता कायम राखली असून पुन्हा एकदा भाजप हरियाणामध्ये सरकार स्थापन होणार आहे. तर दुसरीकडे भाजप हरियाणामध्ये तिसऱ्यांदा सरकार स्थापन करण्याचा दावा होत असून मुख्यमंत्री नायब सिंग सैनी हेच पुन्हा मुख्यमंत्री होणार आहेत. तर सैनी यांच्या सरकारमध्ये मंत्री राहिलेले पाच मंत्री पराभूत झाले आहेत.

# ‘अमरावतीचे वनवैभव’ कॉफी टेबल बुकचे पालकमंत्री पाटील यांच्या हस्ते प्रकाशन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती–** जिल्ह्यातील वनराईने नटलेले वनवैभव, त्यातही मेळघाट परिसरातील निसर्ग वनसंपदा व वन्यजीव असा नैसर्गिक ठेव्याची समृद्धी दर्शविणाऱ्या 'अमरावतीचे वनवैभव' या कॉफी टेबल बुकचे प्रकाशन पालकमंत्री चंद्रकांत (दादा ) पाटील यांच्या हस्ते करण्यात आले .

जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे कॉफी टेबल बुकच्या प्रकाशन सोहळ्यास खासदार डॉ. अनिल बोंडे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, विशेष पोलीस महानिरीक्षक रामनाथ पोकळे, पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, पोलीस उपायुक्त शिवाजी शिंदे, सागर पाटील, जिल्हा माहिती अधिकारी गजानन कोटुरवार, माहिती अधिकारी अपर्णा यावलकर, जिल्हा नियोजन अधिकारी अभिजीत मस्के आदींसह विभागप्रमुख उपस्थित होते. जिल्हा माहिती कार्यालयनिर्मित 'अमरावतीचे वनवैभव' या कॉफी टेबल बुकच्या निर्मितीसाठी माहिती अधिकारी अपर्णा यावलकर यांचा पालकमंत्री श्री. पाटील यांच्या हस्तेसत्कार करुन अभिनंदन करण्यात आले. श्री. पाटील म्हणाले, 'अमरावतीचे वनवैभव' या कॉफी टेबल पुस्तकात मेळघाटातील नयनरम्य निसर्ग सौंदर्य, अरण्यसंपन्न मेळघाटातील वन्यजीव, जैवविविधता यासह आदिवासी संस्कृती यांची उत्तम छायाचित्रासह माहिती देण्यात आली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील नैसर्गिक वारसा, वनसंपदा, कोरकू बांधवांची संस्कृती, चालीरीती यांची दुर्मिळ छायाचित्रे ही कॉफी टेबल बुकची वैशिष्ट्य आहेत.

अमरावतीचे वनवैभव हे कॉफी टेबल पर्यटन क्षेत्राला सहाय्यभूत तसेच संदर्भग्रथ म्हणून निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. पर्यावरणीय मूल्य जाणून जीवसृष्टीचे स्वरूप आणि वनसंपत्तीचे जतन करणे हे आपले मूलभूत कर्तव्य आहे. यामुळे यावर आधारित कॉफी टेबल बुक हे महत्त्वाचे पाऊल आहे .जिल्ह्यामध्ये येणारे पर्यटक अभ्यासक यांनाही हे पुस्तक फायदेशीर ठरणार आहे, असेही श्री. पाटील यावेळी म्हणाले. कॉफी टेबल बुकसाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

# अखेर त्या शेतकऱ्यांच्या खात्यात मदत रक्कम जमा

## नितीन कदम यांच्या पाठपुराव्याला यश

### विजेच्या जिवंत तारेमुळे मृत्यू झालेल्या ८ गायींचे प्रकरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** गेल्या चार महिन्यापूर्वी विद्युत प्रवाहाच्या तारेमुळे गायींचा मृत्यू झाला होता. दरम्यान संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांनी शासनस्तरावर योग्य पाठपुरावा करत नुकसनाग्रस्त शेतकऱ्यांना नुकसानभरपाई मिळवून दिली. आज नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या खात्यात नुकसणाची रक्कम जमा झाली. भातकुली तालुक्यातील हरताळा गावालगत असलेल्या असलेल्या शेतातून जाताना वीज वितरण कंपनीच्या उच्च दाब वाहिनीच्या प्रवाहित तारा पडल्याने तब्बल आठ गायीचा घटनास्थळी मृत्यू झाला होता. कदम यांनी घटनास्थळी पोहोचत परिस्थिति नियंत्रणात आणली होती. हरताळा येथून शेतातून कृषि पंपाच्या पुरवठ्या करिता व विविध शेतीउपयोगी कामाकरिता वीज वितरण कंपनीची उच्च दाब वाहिनी गेली आहे. या वाहिनीच्या जीवंत विद्युत तारा दीपक सनके,किशोर देशमुख,दिलीप दुर्गे,गजानन राऊत,राजू



उघडे,ज्ञानेश्वर चहाकर,जगणराव चुनघोडे यांच्या मालकीच्या तब्बल आठ गाईवर पडल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. यात या शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले. त्यांना वीज वितरण कंपनी व शासनाने आर्थिक नुकसान भरपाई द्यावी अशी मांगणी कदम यांनी केली होती. आता शासनाने या नुकसान व घटनेची दखल घेऊन मदत रक्कम नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली आहे. संकल्प शेतकरी संघटनेचे अध्यक्ष नितीन कदम यांच्या या कौतुकास्पद पाठपुराव्याचे संपूर्ण भातकुली परिसरातून कौतुक होत आहे. दरम्यान यावेळी दीपक सनके,किशोर देशमुख,दिलीप दुर्गे, गजानन राऊत,राजू उघडे ,ज्ञानेश्वर चहाकर,जगणराव चुनघोडे, संकल्प शेतकरी संघटनेचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष संजय चूनकीकर, प्रफुल महल्ले, मोहन भातकुलकर,रोशन सनके,शिवा देशमुख, प्रदीप ठाकूर, दुर्गे, सचिन वानखडे गावकरी उपस्थित होते.

# एक माळी दो फूल। ... प्रेमाच्या त्रिकोणाचा संशय

## तरुणीकडून महिलेचा खून:मागील ४८ तासातील शहरात घडलेली खुनाची चौथी घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** प्रेमाच्या त्रिकोणातील संशयातून एका तरुणीने २७ वर्षीय महिलेचा चाकूने छाती, हातावर वार करून खून केला आहे. ही घटना मंगळवारी ८ ऑक्टोबरला सायंकाळी साडेसात ते आठ वाजताच्या सुमारास अमरावती ते बडनेरा सुपर एक्स्प्रेस हायवेवरील एका मंदिराजवळ घडली. या घटनेनंतर मारेकरी तरुणीला पोलिसांनी काही वेळातच अटक केली दरम्यान मागील ४८ तासातील शहरात झालेली ही खूनाची चौथी घटना आहे.

शुभांगी काळे (२७, रा. आर्वी पुनर्वसन, जि. वर्धा) असे मृतक महिलेचे नाव आहे. शुभांगीचा खून करणाऱ्या तरुणीचे एका तरुणाशी प्रेमसंबध आहे. दरम्यान याच तरुणाचे शुभांगीशीही प्रेमसंबंध असल्याचा संशय त्याच्या प्रेयसीला होता. त्या कारणावरून त्यांच्यात वाद सुरू होते. त्यामुळेच तरुणाने मंगळवारी सायंकाळी शुभांगीला आणि त्याच्या प्रेयसीची समोरासमोर भेट घालून रुजवात करुन देण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी शुभांगीला त्या तरुणाने बोलावले. त्यावेळी तरुणाची प्रेयसीही एक्सप्रेस हायवेवरील एका मंदिरापासून सुमारे ५० फूट अंतरावर उभी होती. दरम्यान, शुभांगी तिच्या एका मैत्रिणीच्या मुलाच्या वाढदिवसानिमित्त शहरात आलीच होती. ती एका कंपनीत काम करत असल्याची माहिती समोर आली आहे. शुभांगीची भेट घालून देण्यासाठी सायंकाळी सात वाजता तरुणाने त्याच्या प्रेयसीला सुपर एक्स्प्रेस हायवेवरील मंदिराजवळ बोलावले. शुभांगी तेथे आल्यावर तरुणाच्या प्रेयसीने तिच्याशी वाद घातला. त्यात तिने भाजी चिरण्याच्या



चाकूने शुभांगीवर दोन ते तीन वार केले. या वेळी हात आणि छातीवर केलेल्या वारामुळे मोठा रक्तस्राव झाला. शुभांगीला गंभीर अवस्थेत रुग्णालयात नेले . मात्र, डॉक्टरांनी तिला तपासणीअंती मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, एसीपी जयदत्त भंवर, गुन्हे शाखेचे पीआय बाबाराव अवचार, राजापेठचे ठाणेदार पुनीत कुलट यांनी रुग्णालय व घटनास्थळ गाठले.

शुभांगीवर हल्ला केल्यानंतर मारेकरी तरुणी फरार झाली असून, पोलिस तिचा शोध घेत आहेत. दरम्यान रात्री दहा वाजताच्या सुमारास पोलिसांनी संबधित तरुणाला चौकशीसाठी ताब्यात घेतले .

# विविध योजनांच्या अनुदानाची रक्कम तातडीने वितरित करावी- खासदार बळवंत वानखेडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९अमरावती,** केंद्र आणि राज्य शासनातर्फे शेतकरी आणि गरजू वर्गाला मदत करण्यासाठी विविध अनुदानाच्या योजना राबविण्यात येते. या योजनांचे अनुदान विहित कालावधीत आणि विनाविलंब लाभार्थ्यांना तातडीने वितरीत करावी, असे निर्देश खासदार बळवंत वानखेडे यांनी दिले. जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीची सभा जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात पार पडली. यावेळी खासदार अनिल बोंडे, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे, विरेंद्र जगताप, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प अधिकारी प्रिती देशमुख आदी उपस्थित होते. श्री. वानखेडे म्हणाले, शासनातर्फे प्रामुख्याने सिंचन विहिरी, गोठे बांधकाम, घरकुल आदी योजनांसाठी अनुदान मोठ्या



प्रमाणावर देण्यात येते. शासनाकडून अनुदान उपलब्ध असताना लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम पोहोचण्यात विलंब होतो. हा विलंब टाळण्यासाठी शासकीय यंत्रणांनी तातडीने कार्यवाही करावी. ज्यामुळे लाभार्थ्यांना वेळेवर मदत मिळण्यास मदत होईल. घरकुल योजनेत अनेक अपात्र लाभार्थ्यांचा समावेश झाला आहे. त्यामुळे याबाबत तातडीने चौकशी करून अपात्र लाभार्थ्यांवर कारवाई करावी. त्यांना पहिल्या हप्त्याचा लाभ मिळालेला असल्यास वसुलीची कार्यवाही करण्यात यावी.रोजगार हमी योजनेतून कामे उपलब्ध करून देताना त्यांची मजुरी दर १५ दिवसात मिळेल याची दक्षता घ्यावी. केंद्र शासनाचे १०० दिवसांची मजुरी दिली गेल्यानंतर उर्वरीत मजुरीसाठी विलंब होत आहे. ही मजुरी तातडीने मिळण्यासाठी निधीची मागणी करण्यात यावी. तसेच मजुरी वितरण करणाऱ्या यंत्रणांना निधी उपलब्ध करून देऊन मजुरी देण्यात यावी. तसेच पांदण रस्त्याची कामे तातडीने करण्यात यावी. ग्रामीण भागातील रस्ते बांधकाम करताना चाचणी करण्यासाठी प्रयोगशाळा त्याच ठिकाणी असावी. प्रयोगशाळेत सर्व तपासण्या केल्यानंतरच कामे करण्यात यावी. प्रत्येक घराला नळाद्वारे पाणी पुरवठा करण्याचे ध्येय ठेवण्यात आले आहे. ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याच्या योजनांमध्ये सांडपाणी जाऊ नये याची दक्षता घ्यावी. तसेच पाणी पुरवठा करणाऱ्या नळाच्या पाईपलाईन दर्जेदार असाव्यात. ज्या पाणी पुरवठा योजनांची कामे योग्य झालेली नसल्यास त्यांची तात्काळ चौकशी करण्यात यावी. वीज वितरण योग्य पद्धतीने होण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता आहे. कृषी वाहिन्यांच्या तारांची दुरूस्ती करण्यात यावी. सन्मान योजनेची हप्ता मिळाला नसलेल्या शेतकऱ्यांची माहिती घेऊन त्यांची तातडीने ई–केवायसी करावी. तसेच आरोग्य केंद्रांची कामे चांगल्या दर्जाची करावीत, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.

# भाजपच्या दिल्लीतील विजयी सभेतील गडकरींच्या अनुपस्थितीची चर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९नागपूर :** भाजपच्या हातून हरियाणा राज्य जाणार अशीच चर्चा तेथील विधानसभा निवडणुकीपूर्वी होती, माध्यमांनी केलेल्या निवडणूक पूर्व सर्वेक्षणाचे कलही हेच संकेत देणारे होते. सकाळी मतमोजणीचे कल येणे सुरू झाल्यावरही कल काँग्रेसच्या बाजूचेच होते अन काही वेळाने चित्र पालटले, भाजपने निर्णायक आघाडी घेत काँग्रेसला मागे टाकले आणि बहुमताचा आकडा पार केला. अपेक्षेप्रमाणे भाजपने हरियाणा काबिज केले. न निवडणुकीतील विजय साजरा करण्याची भारतीय जनता पक्षाच्या पद्धती प्रमाणे जल्लोष देशभर जल्लोष झाला. दिल्लीतील पक्षाच्या मुख्यालयात मोदींच्या उपस्थितीत विजयी सभाही पार पडली. पण एक गोष्ट त्यात खटकणारी ठरली. हरियाणात प्राचाराला गेलेले गडकरी व्यासपीठावर अनुपस्थित होते. भारतीय जनता पक्षाने केंद्रात सलग तिसऱ्यांदा सत्ता स्थापन केली. यावेळी भाजपला बहुमताचा आकडा पार करता आला नाही, दुसरीकडे काँग्रेसने लोकसभेच्या संख्याबळाची शंभरी पार केली. यावरून भाजपचा जनाधार कमी होत चालला, अशी टीका विरोधकांनी सुरू केली. त्यांचे लक्ष्य हे पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय मंत्री अमित शहा हेच होते. महाराष्ट्रातही भाजपला जबर फटका बसला. या निवडणुकीनंतर लगेच हरियाणा आणि जम्मू काश्मिर विधानसभेच्या निवडणुका जाहीर झाल्या. नेहमीप्रमाणे भाजपने यात संपूर्ण ताकद झोकून दिली. मात्र जनमत भाजपच्या विरोधात असल्याचेच चित्र या



प्रदेशात निवडणूक काळात दिसून येत होते. काँग्रेस यावेळी या राज्यात मुसंडी मारणार असे राजकीय विश्लेषक सांगत होते. निवडणूक पूर्व सर्वेक्षणाचे कलही हीच बाब अधोरेखित करीत होते. त्यामुळे काँग्रेसच्या गोटात उत्साह होता व भाजपकडून सावधपणे पावले उचलली जात होती. निवडणुकीचे निकाल मात्र भाजपच्या बाजूने लागले आणि काँग्रेसला धक्का बसला. निकाल जाहीर होताच भाजपमध्ये उत्साहाला उधाण आले. देशात सर्वत्र पक्ष कार्यकर्त्यांनी जल्लोष सुरू केला. दिल्लीतील भाजपच्या मुख्यालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत विजयी सभा पार पडली. प्रथेप्रमाणे विजयी सभेला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, पक्षाचे अध्यक्ष ज.पी. नड्डा यांच्यासह संबधित राज्याचे पक्षाचे प्रभारी उपस्थित राहतात.हे सर्व नेते यावेळी होते. पण बहुतेक वेळा या संभांना केंद्रीय मंत्री नितीन गडकरीही उपस्थित राहिले आहे. यावेळी गडकरी यांनी हरियाणात अनेक प्रचार सभा घेतल्या होत्या. ते मंगळवारी दिल्लीतही उपस्थित होते. त्यामुळे विजयी सभेत त्यांची उपस्थिती अपेक्षित होती. पण ते व्यासपीठावर न दिसल्याने तर्क वितर्कांना सुरूवात झाली आहे.

# लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आंदोलने, चळवळ महत्त्वाची- प्रा. उदयन शर्मा

## शहरातील जोशी हॉल येथे केला नागरी सत्कार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती–** सध्या लोकशाही धोक्यात आली आहे. तसेच अशी परिस्थिती या आधी जेव्हा जेव्हा आली, तेव्हा तेव्हा देशभर चळवळ उभी राहते. देशात आणीबाणीची स्थिती होती. त्यामुळे लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी आंदोलने, चळवळ महत्वाची आहे. असे प्रतिपादन कॉम्रेड प्रा. उदयन शर्मा यांनी केले.

रविवारी कॉम्रेड प्रा. उदयन शर्मा नागरी सत्कार समारोह



जोशी हॉल येथे घेण्यात आला. या वेळी ते बोलत होते. या वेळी कार्यक्रमाला अमरावती विद्यापीठाचे माजी परीक्षा नियंत्रक प्रा. बी आर वाघमारे, विधानसभा माजी उपसभापती शरद तसरे, अशोक ढवले, माजी खासदार अनंत गुढे, माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख, कम्युनिस्ट पक्षाचे केंद्रीय कोंसिल सदस्य तुकाराम भस्मे, माजी महापौर विलास इंगोले, काँग्रेस शहराध्यक्ष बबलू शेखावत, शिवसेनेचे सुनील खराटे, प्रा. उदयन शर्मा यांच्या पत्नी प्रमोदिनी शर्मा आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान प्रा. उदयन शर्मा यांच्या जीवनावरील आधारित चित्रपित (लघुपट) दाखविण्यात आला. तसेच यावेळी त्यांचा शर्मा यांचा मान्यवरांनी सहपत्निक सत्कारही केला. कार्यक्रमांचे संचालन व आभार वरिष्ठ पत्रकार अनिल अग्रवाल यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जेष्ठ पत्रकार नानक आहुजा, प्रदीप देशपांडे, ड. दिलीप एडतकर, विलास मराठे, चंदू सोजतिया, अरुण तिवारी, जितु दोषी, अमोल इंगोले, रविंद्र लाखोडे, इमरान अशरफी, मेराज पठाण,भैय्या ठाकुर, प्रा. डॉ. किशोर फुले, नूटा के प्रा. प्रवीण रघुवंशी, प्रा. महेंद्र मेटे, सुभाष गवई, पप्रा. एन. आर. राठी, पी. बी. उके, डी. एस. पवार, चंदु वाकोडे, सुनील मेटकर, रमेश सोनुले, सुनिल देशमुख, सुभाष पांडे आदींनी परिश्रम घेतले.

# राशन दुकानदार जाणार संपावर

## कमिशन मध्ये वाढकरण्याची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९धामणगाव रेल्वे :**शासनाने अनेक वर्षांपासून रेशन दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ न केली नाही. त्यामुळे कमिशनमध्ये वाढ करण्याच्या मागणीसाठी रेशन दुकानदारांनी १ नोव्हेंबरपासन संपावर जाण्याचा निर्णय घेतला असल्याची स्वस्त धान्य दुकानदार संघटनेच्या राज्य महासंघाचे अध्यक्ष डी. एन. पाटील व राजेश आंबुसकर यांनी दिली.रेशन दुकानदारांच्या कमिशनमध्ये वाढ करण्यात यावी, अशा आशयाचे निवेदन अनेकवेळा शासनाला सादर करण्यात आले. त्या अनषंगाने शासनाने पदाधिकारी ऱ्यांबरोबर बैठकाही घेतल्या. परंतु, आश्वासना व्यतिरिक्त रेशन दुकानदारांच्या पदरात काहीच पडले नाही. त्यामुळे राज्यात असलेल्या स्वस्त धान्य दुकानदारांच्या दोन्ही संघटनांनी एकत्र येत आपल्या विविध मागण्यां संदर्भात श्रीसंत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती येथे मेळावा घेतला. या मेळाव्यास दोन्ही संघटनांचे आपल्या मागण्यांबाबत शासन उदासीन असल्यामुळे सर्वानुमते १ नोव्हेंबरपासून रेशन दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय यावेळी एकमताने घेण्यात आला. कमिशनमध्ये वाढ करावी, याबरोबरच मे २०२२ मध्येच मोफत वाटप केलेल्या धान्याचे कमिशन मिळावे, नोव्हेंबर २०२२ मध्ये रोख चलनाने भरलेले पैसे त्वरित मिळावे, दरमहा विक्री केलेल्या मालाचे कमिशन दरमहाच मिळावे, यासह अन्य मागण्यांवर यावेळी चर्चा करण्यात आली.

# दुर्गा देवीचा नवीन मुकुट या वर्षी भक्तांच्या आकर्षणाचे केंद्र

## फरीदाबादवरुन आणलेल्या विशेष पत्र्यापासून स्थानिक कारागिराकडून मुकुटाची निर्मिती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९फुलसावंगी–** फुलसावंगी येथे महाकालीचे पुरातन काळातील मंदिर असून या मंदिराची विशेष बाब म्हणजे या देवीचा मुखवटा हा महाराष्ट्रातील देवीच्या मुखवट्यांमध्ये सर्वाधिक मोठा आहे. या पुरातन मंदीरात वर्षभर तर भक्तांची वर्दळ असतेच मात्र नवरात्र उत्सवामध्ये येथे दर्शनासाठी भक्तांच्या रांगा लागत असतात. दसऱ्याला पालखीतून देवी सीमोल्लंघनाला जात असते. दोन शतकाचा जुना इतिहास फुलसावंगी येथील दुर्गा देवीच्या नावाने नावलौकिक असलेले महाकाली देवीचे पुरातन मंदिराचा आहे. त्यातच यावर्षी महाराष्ट्रातील सर्वात मोठा मुखवटा असलेल्या देवीला तांब्याच्या पत्र्यापासून तयार करण्यात आलेला मुकुट लावण्यात आला आहे. जो सद्या भक्तांच्या आकर्षणाचा विषय ठरत आहे.

येथे महाकालीचे मंदिर पुरातन काळातील आहे. या देवीच्या मुखवट्याची निर्मिती ही बेल, राळ व शेंदूरने केली गेली आहे हे विशेष. जवळपास ७ फूट उंच व ६ फूट रुंद असा महाकाय मुखवटा या देवीचा असून हा मुखवटा महाराष्ट्रात सर्वाधिक मोठा असल्याचे बोलले जाते. जवळपास दोन शतक पुरातन हे मंदिर आहे. साडेतीन शक्तीपीठांपैकी एक संपूर्ण शक्तीपीठ असलेल्या रेणुका देवीच्या दक्षिणेस हे महाकालीचे मंदिर असून याला माहूर गडाचे दक्षिणद्वार पण मानल्यास जाते. विशेष म्हणजे येथे मंदीराच्या पूर्वेस हेमाडपंथी पुनेश्वर मंदिर पश्चिम मुखी आहे. गावाच्या पश्चिमेला हे पुरातन महाकाली मंदिर आहे. या देवीच्या मंदिराला दुर्गादेवी मंदिर म्हणून पंचक्रोशीत ख्याती आहे. नवरात्र उत्सवात येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. नवमीच्या दिवशी येथे मोठा होम केला जातो. तर दसऱ्याच्या दिवशी वाजत गाजत देवीची पालखी सीमोल्लंघन करण्यासाठी जात



असते. दसऱ्याच्या दिवशी सर्वात आधी दुर्गादेवीच्या चरणी सोने अर्पण करून मगच इतरांना दसऱ्याचे सोने देण्याची पद्धत फुलसावगी येथे आहे. या वर्षी फरीदाबाद वरून देवीच्या मुखवट्यासाठी मुकुट तयार करण्यासाठी वापरण्यात येणारा पत्रा बोलवण्यात आला. इतर ठिकाणी या मुकुटावरील नक्षी कामासाठी लाखो रुपये खर्च केले असते मात्र या मुकुटावरील सर्व नक्षीकाम हे फुलसावंगी येथील प्रदीप छन्नीकर यांनी अतिशय कमी मोबदल्यात करुन दिले असून ते अतिशय सुंदर झाले आहे. या महाकाय मुखवट्याला आता या नक्षीकाम केलेल्या मुकुटाने देवीच्या सौंदर्यात भर घातली असून सद्या हा मुकुट भक्तांच्या आकर्षणाचा विषय ठरत आहे.

संपूर्ण महाष्ट्रातील ऐकमेव महाकाय मुखवटा असलेली महाकालीची मूर्ती ही फुलसावंगी येथील असून, हे मंदिर पंचक्रोशितील भक्तांच्या श्रद्धेचा केंद्रबिंदू आहे. वर्षभर भक्तांची वर्दळ असलेले प्रसिद्ध अशा या मंदिराला पर्यटन स्थळचा दर्जा मिळावा ही मागणी आहे. मात्र शासकीय स्तरावर ही मागणी अजूनही प्रलंबीत आहे. मागणी पूर्ण झाल्यास मंदिर परिसरातील विकासाला अधिक चालना मिळेल.

# जिल्ह्यात जलयुक्त शिवारसाठी ५७.८ कोटींचे नियोजन

## सहा विभागांकडे ६७३ कामांची जबाबदारी; भूजल सर्वेक्षण'कडे सर्वाधिक ३३ कोटींची कामे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९ अमरावती –** शासनाची महत्वाकांक्षी योजना असलेल्या जलयुक्त शिवार करीता यंदा ५७ कोटी ८८ लाखांचे नियोजन मृद व जलसंधारण विभागाने केले आहे. या विभागासह जिल्हा परिषद, जलसंपदा, भूजल सर्वेक्षण, कृषि, वनविभाग या विभागाकडे कामांची जबाबदारी देण्यात आली आहे. ६७६ कामांना या विभागाकडून मंजुरी देण्यात आली आहे. सर्वाधिक ४४४ कामे भूजल सर्वेक्षण विभागाकडे देण्यात आली आहे.

राज्यात तत्कालिन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी २०१५ ला जलयुक्त शिवार योजना कार्यान्वित केली होती. दरम्यान २०१९ मध्ये झालेल्या सत्तांतरानंतर मविआ सरकारने या योजनेतील भ्रष्टाचार व तांत्रिक त्रुट्यांच्या आधारावर ही योजना गुंडाळली होती. त्यानंतर पुन्हा सत्तेवर आलेल्या महायुती सरकारने ही योजनेला पुन्हा प्रांरभ केला आहे.



गतवर्षी या योजनेंतर्गत तीस कोटी रूपयांची कामे जिल्हयात विविध यंत्रणांमार्फत करण्यात आलीत. यंदा २०२४-२५ या वर्षाकरीता नियोजन तयार करण्यात आले असून या वर्षात सात यंत्रणांमार्फत ६७३ कामे करण्यात येणार आहेत.

मृद व जलसंधारण विभागाने नियोजन तयार केले असून त्यासाठी ५७.८३ कोटी रूपये खर्च अपेक्षीत केला आहे. ६७३ कामांपैकी ५६६ कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली असून ती ३३.६५ कोटी रूपयांची आहेत.

तर, २४.१८ कोटीच्या १०७ कामांना प्रशासकीय मान्यता मिळवण्यासाठी प्रस्ताव उपजिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करण्यात आले आहेत. रब्बी हंगाम आटोपल्यानंतर जलयुक्तच्या कामांना प्रारंभ होणार आहे. यामध्ये सर्वाधिक कामे भूजल सर्वेक्षण विभागाची आहेत तर पहील्या टप्प्यात कृषि विभागाच्या २५ पैकी एकाही कामास प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही.

गतवर्षीचे पंधरा कोटी रुपयांचे देयक थकीत गतवर्षी या योजनेंतर्गत तीस कोटी रूपयांची कामे जिल्हयात विविध यंत्रणांमार्फत करण्यात आलीत.

त्यातील पंधरा कोटी रूपयांचे देयक अद्यापही थकीत आहेत. शासनाकडे प्रस्ताव पाठविल्यानंतर तीन कोटी रूपये प्राप्त झाले आहेत. अशी माहिती मृद व जलसंधारण अधिकारी सुनील जाधव यांनी दिली.

# महाविकास आघाडीच्या १९० जागा फायनल:९८ जागांवर चर्चेचा खल

## दोन दिवसांत अंतिम निर्णय; दसऱ्यापर्यंत जागावाटप होण्याची शक्यता

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.९मुंबई–** हरियाणा, जम्मू-काश्मीर विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर महाराष्ट्रात कोणत्याही क्षणी आचारसंहिता लागू शकते. या पार्श्वभूमीवर महायुती-महाविकास आघाडीच्या जागावाटपाची बोलणी अंतिम टप्प्यात आली आहे. मविआच्या नेत्यांची सोमवारपासून तीन दिवस अंतिम चर्चेची बैठक मुंबईत सुरू झाली आहे. २८८ पैकी १९० जागांच्या जागावाटपावर आघाडीत एकमत झाले असून उर्वरित ९८ जागांबाबत या तीन दिवसांत निर्णय घेतला जाणार असल्याची माहिती बैठकीला उपस्थित सूत्रांनी दिली.

उद्धवसेनेने १२५, काँग्रेसने १०० तर शरद पवार गटाची ८० ते ९० जागांवर तयारी पूर्ण झाली आहे. विदर्भ, मराठवाडा आणि मुंबईतील काही जागांचा तिढा सुटलेला नसल्याने मंगळवारी आणि बुधवारी त्याबाबत चर्चा करण्यात येणार आहे. मात्र काहीही झाले तरी १२ ऑक्टोबरला दसऱ्यापर्यंत जागावाटप निश्चित होणार असल्याचेही सांगण्यात आले.

### मैत्रीपूर्ण लढतीचीही चाचपणी

काही जागांवरचा तिढा सुटत नसल्याने अशा ठिकाणी मैत्रीपूर्ण लढतीच्या चाचपणीबाबतही बैठकीत चर्चा झाल्याचे सूत्रांनी सांगितले. २०१९ च्या विधानसभेला काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये १० जागांवर मैत्रीपूर्ण लढत झाली होती. आता केवळ चाचपणी आल्याचे सूत्रांनी सांगितले.



### काँग्रेस पक्षाला हव्यात विदर्भात सर्वाधिक जागा

विदर्भात ६२ जागा आहेत. लोकसभेला इथे चांगले यश मिळाल्याने काँग्रेसला विधानसभेलाही जास्त जागा हव्यात. तिथे त्यांची स्पर्धा ठाकरे गटाशी आहे. मराठवाड्यात हेच चित्र आहे. नागपूर, बुलडाणा, रामटेक, मुंबईतील भायखळा, बोरिवली आदी जागांवर उद्धवसेना आणि काँग्रेसकडून रस्सीखेच सुरू आहे.

# अमरावती शहरातील वाढती गुन्हेगारी अंमली पदार्थ ,चायना चाकू विक्रीवर मनसे,युवक काँग्रेस आक्रमक : पोलीस आयुक्तांना दिले निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

गेल्या महिन्याभरात अमरावती शहरांमध्ये सात हत्या आणि मोठ्या प्रमाणात गुन्हेगारी कारवाया झालेल्या आहेत. त्यापैकी पाच हत्या तर ३६ तासांच्या कालावधीत घडलेल्या आहेत. मोठ्या प्रमाणात चऊ ड्रग व इतर अमली पदार्थांच्या विळख्यात तरुणाई गुंतलेली आहे. त्याच बरोबर या गुन्ह्यात अल्पवयीन मुलांचा सहभाग ही तर अत्यंत चिंताजनक परिस्थिती आहे. त्याच्यासोबतच मोठ्या प्रमाणात जातीय तणाव, धार्मिक तणाव निर्माण झाल्याच्या घटना सुद्धा घडलेल्या आहेत. एकंदरीतच शहरातील शांतता,सामाजिक सौहार्द, कायदा व सुव्यवस्था धोक्यात आलेली असल्याची सार्वत्रिक भावना नागरिकांमध्ये निर्माण झालेली आहे. अमरावती शहर विदर्भाचे क्राईम कॅपिटल म्हणून उदयास येत आहे. आणि अशा या सगळ्या एकंदरीत परिस्थितीमध्ये प्रशासनाचे अस्तित्व कुठेही दिसत नसल्याची सुद्धा भावना नागरिकांमध्ये आहे. वाढत्या गुन्हेगारीचे संघटीकरण होत आहे की काय आणि या गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन मुले अग्रेसर असून त्यांच्यावर प्रशासनाचा वा पोलिसांचा कोणताही धाक नसल्याचे जळजळीत वास्तव मनसे व युवक कॉंग्रेसने निर्दर्शनास आणून दिले .

या सर्व घटनांमध्ये वापरण्यात आलेले शस्त्र हे चायना चाकू असल्याचे निर्दर्शनास आलेले आहे. अशी घातक शस्त्रे सहजासहजी गुन्हेगारांना उपलब्ध होणे हे सुद्धा अत्यंत चिंतेची बाब आहे. घटना घडल्यानंतर त्यानंतर पोलिसातर्फे कारवाई केल्या जाते परंतु काही घटनांमध्ये पोलिसांपर्यंत तक्रारी येऊन सुद्धा त्याची योग्य वेळी दखल न घेतल्यामुळे त्याचे पर्यावसन पुढे हत्या सारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये झाल्याचे एव्हाना लक्षात आलेले आहेत. तरी अमरावती शहरात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरिता यापेक्षाही अधिक ऍक्टिव्ह पोलिसिंगची गरज असल्याचे या निवेदनाच्या माध्यमातून पोलीस आयुक्तांच्या निर्दर्शनास आणून देण्यात आले. अमरावती शहर हे सातत्याने एका शांततावादी शहरांमध्ये गणना होणारे शहर आहे. परंतु गत काही काळात अमरावती शहराच्या या ओळखीला नख लागण्याचे प्रकार सातत्याने घडत आहे. तरी उपरोक्त या सर्व मुद्द्यांचे संज्ञान घेऊन उचित कार्यवाही करावी अशी या निवेदनाद्वारे युवक कॉंग्रेसद्वारे आम्ही मागणी करण्यात आली.

यावेळी अमरावती विधानसभा युवक कॉंग्रेस अध्यक्ष वैभव देशमुख, औद्योगिक सेल अध्यक्ष समीर जवंजाळ, जिल्हा युकॅ उपाध्यक्ष अनिकेत ढेंगळे, अक्षय साबळे, कामगार सेल अध्यक्ष राहूल वानखडे, एनएसयुआय अध्यक्ष संकेत साहू, ब्लॉक अध्यक्ष आकाश धुराटकर, शुभम बांबल, प्रतिक गजभिये, रोशन इंगळे, आशिष चौहान, कृणाल गावंडे, मोहीत भेंडे, सुशील वानखडे,अमोल राऊत, मोहीत भेंडे, केदार भेंडे, सुजल इंगळे, श्रेयस धर्माळे, आकाश गेडाम, धनंजय बोबडे, धम्मा मोहोड, अभिषेक भोसले, साहिल वानरे,निशांत पवार व इतर युवक कॉंग्रेस पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पप्पु पाटील यांच्या नेतृत्वात मनसे चे निवेदन

अमरावती शहरात वाढत्या गुन्हेगारीबाबत पोलीस आयुक्त याना निवेदन देण्यात आलेसामान्य जनतेच्या रोष निर्माण झालेला आहे.कायदा सुव्यस्था सुरळीत राहावी सोबत अवैध धंदेव गुटखा बंदी यावर पोलीस आयुक्तांशी चर्चा करण्यात आलीयावेळी मनसेचे स्थानिक नेते पप्पू पाटील शहराध्यक्ष धिरज तायडेबबलू भाऊ आठवले प्रवीण भाऊ डांगे,सुशील पाचघरे विकी थेट उपस्थित होते.

# भाड्याने गरब्यासाठी पोषाख अन् दागिन्यांना मागणी

## गत वर्षीपेक्षा ३० टक्के मागणीत वाढ



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

नवरात्रोत्सवात तरुणाईत गरबा नृत्याचा उत्साह असून घागरा-चोली, चुनरी, धोती-कुर्ता, टिपर्यांसह ऑक्साइड दागिन्यांना पसंती आहे. ऑनलाइन खरेदीही होत आहेत. नवरात्रीनिमित्त बाजारपेठा सजल्याचे दिसते. दररोज वेगळा ड्रेस खरेदी करणे परवडत नसल्याने घागरा-चोली, केडीया भाड्याने घेत आहे. त्यावरील डिझाईननुसार त्याची किंमत ठरते . या कपड्यांसह दागिनेही भाड्याने दिले जात असून, गत वर्षीच्या तुलनेत ३० टक्के मागणी वाढल्याचे विक्रेत्यांनी सांगितले आहे. गरबासाठी घागरा चोलीची खरेदी करताना तरुणाई. तरुणाईत आकर्षक रंगांची वाढती क्रेझ मी अनेक वर्षांपासून नवरात्रीत कपडे भाड्याने देण्याचा व्यवसाय करतो. दरवर्षी गरबा व दांडियाच्या कार्यक्रम वाढच होत असल्याने या कपड्यांची मागणीही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तरुणांमध्ये महिलांप्रमाणे नऊ दिवस नऊ रंगांची क्रेझ आहे. विशेष म्हणजे भाड्याने मिळणारे कपडे व दागिन्यांना मागणी वाढत आहे.

गरबात युवती, महिलांसाठी घागरा-चोली, पुरुषांसाठी केडीया व जॅकेट असे हे पेहराव केले जातात. यातही अनेक प्रकार असून, त्यांची मागणी वाढली आहे. त्यामुळे हे कपडे विकणार्या व भाड्याने देणार्या व्यावसायिकांकडे सध्या याची मागणी वाढली आहे.

# थंडगार शिवशाही नको रे बाबा; आपली लालपरीच बरी

## शिवशाहीचे प्रवासी त्रस्त : तिकीट मोठी सुविधेचा बोजवारा; असतो स्वच्छतेचा अभाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

प्रवाशांच्या सुविधेसाठी राज्य परिवहन महामंडळाने शिवशाही बस सुरू केली आहे. सुविधायुक्त बसचा प्रवास असल्याने या बसचे भाडे साधारण बसच्या तुलनेत दीडपट आहे. परंतु, यात सुविधा नावालाच झाली आहे. शहरातील बसस्थानकांतील शिवशाही बसची प्रत्यक्ष पाहणी केली असता शिवशाही बसचे पडदे घाणेरडे, चार्जर व वायफाय नावालाच असल्याचे दिसून आले. प्रवाशांना वातानुकूलित बससेवेचा लाभ मिळत असला तरी बसमध्ये स्वच्छता नसते. त्यामुळे थंडगार शिवशाहीपेक्षा साधी लालपरी बरी असे अनेक प्रवाशांचे मत दिसते. शिवशाहीच्या प्रवासाची मोठी किंमत मोजूनही सेवा लालपरीसारखीच मिळत असल्याने कमी किंमतीतून लाल परीचा प्रवास करणे लोक पसंत करीत आहेत.प्रवाशांना आरामदायी खुच्र्यांची सोय करण्यात आली आहे. मात्र, या खुच्र्याचे देखील हाल झाले आहेत. प्रवाशांकडून दीडपट भाडे वसूल करूनही प्रवाशांना खराब खुच्र्यांवर बसावे लागत आहे. या खुर्चा बदलण्याची अपेक्षा प्रवाशांना आहे.शिवशाही ही वातानुकूलित बस आहे. त्यामुळे उन्हाळ्यात या बसमधून प्रवास करणाऱ्यांची संख्या मोठी असते. मात्र बसला असलेल्या एसीत अनेकदा बिघाड येत असतो. एसी स्विच खराब झाल्यास ती बंद पडते. कधी कधी तांत्रिक अडचणीमुळेही शिवशाही बसही बंद पडतात.

### पडदे घाणेरडे

मागील अनेक दिवसांपासून शिवशाही बसमधील पडदे धुतलेले नाहीत. धूळ, मातीने अनेक दिवसांपासून हे पडदे मळकटलेले दिसतात. स्वच्छतेची वरिष्ठांनी पाहणी करणे आवश्यक आहे.

### चार्जर बंद

शिवशाही बसमधील प्रत्येक खुर्चीजवळ चार्जरची सोय करण्यात आली आहे. मात्र, बसमधील एक किंवा दोनच चार्जर सुरू असतात. यामुळे प्रवाशांना मोबाइल चार्ज करताना अडचणींचा सामना करावा लागतो.

### एसीमध्ये कोंबलेले कागद

एसी फॅन बंद करण्यासाठी अनेकजण यामध्ये कागद टाकून ते बंद करतात. मात्र यामुळे नंतर ही एसी सुरू करताना त्रास हातो.

# छोट्या कामांसाठी लागणारा १००रु.यांचा स्टॅम्प बंद आता पाचशे रुपयांचा घ्यावा लागणार स्टॅम्प




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सध्या राज्यात नद्या मंजूर, डॉगर मंजूर असा कारभार सुरू आहे. एक नव्हे हजारो योजना आल्या आहेत. मात्र, एका हाताने हजार द्यायचे अन् दुसऱ्या हाताने दहा हजार काढून घ्यायचे असा काही प्रकार सुरू आहे. लाडक्या बहिणींना दीड हजार दिले. मात्र, त्याच बहिणींच्या खऱ्या भावाकडून काही हजार काढून घेतले जात आहे. आतापर्यंत नोटरीचा साधा बॉड १०० रुपयांना मिळत होता. आता तो ५०० रुपयांना मिळणार आहे.

बहिणीला दिलेले भावाकडून वसूल करून घेत असल्याच्या प्रतिक्रिया समाज माध्यमातून व्यक्त होत आहे. विधानसभेची निवडणूक तोंडावर येताच राज्य सरकार विविध योजना राबवत आहे. राबवलेल्या योजनांचे स्वागतच आहे. मात्र, हा प्रकार निव्वळ मतदारांना आकर्षित करण्याचा असल्याचे स्पष्टहोत आहे. बरे या योजनांमधून सर्वांचे भले होत असेल तर लोकांना समाधान वाटले असते. मात्र, सरकारने विकास कामाला खुट्टी मारत लाडक्या बहिणी व इतर योजनांसाठी दिलेल्या पैशांची वसुली सुरू केली आहे. एका हाताने देऊन दुसऱ्या हाताने वसूल करण्याचा धंदा राज्य सरकार करत आहे. लाडक्या बहिणीची योजना सुरू करून महिलांना खुश करण्यात आले परंतु, शेतीमालालभाव नाही, बेरोजगारी वाढली आहे. नोकरी मिळालीच तर ती कंत्राटी असते. दर्जेदार शिक्षण दुर्मीळ झाले आहे. आशा अनेक गोष्टीसाठी नागरिक झगडत आहेत. पण राज्य सरकार याकडे दुर्लक्ष करून मतदारांना तात्पुरते खुश करण्याचा प्रयत्न करत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना सुरू करून महिलांना खुश केले पण लाडक्या भावाचा खिसा कापला जात आहे. यापूर्वी नोटरी अथवा विविध कामासाठी १०० रुपयांचा बाँड मिळत होता. तो आता बंद करण्यात आला असून लहान मोठे काम असले तरी ५०० रुपयांचा बाँड भावांना घ्यावा लागणार आहे. यातून सरकार बहिणीला दिलेले भावाकडून कैकपटीने वसूल करत आहे. याचा फटका सध्याच्या सत्ताधाऱ्यांना बसणार आहे.

विविध कामांसाठी सर्वसामान्य लोक रोज लाखो बाँडची खरेदी करतात. यापूर्वी नोटरी अथवा इतर लहान मोठ्या कामासाठी अवघ्या १०० रुपयांचा बाँड मिळत होता. लाडकी बहीण व इतर अनेक योजना राबविल्यानंतर या बाँडची किंमत ५०० टक्के वाढ करून ५०० एवढी करण्यात आली आहे. हा प्रकार लाडक्या बहिणींना दिलेले भावाकडून वसूल करण्याचा असल्याच्या बोलक्या प्रतिक्रिया लोक व्यक्त करत आहेत. समाज माध्यमात याची जोरदार चर्चा असून लाडक्या बहिणीतून कमावले अन् भाऊ नाराज करून गमावले, अशी गत विद्यमान सरकारची होणार आहे.

# तिवसा येथे राजर्षी शाहू महाराज वाचनालयाच्या जागेसाठी उपोषण : उपोषणाला अनेक संघटनाचा पाठिंबा




**विदर्भ प्रजासत्ताक दि.९तिवसा**

स्थानिक तिवसा नगरपंचायत क्षेत्रातील राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालयाचे जागे संदर्भातला निवाडा निकाली न निघाल्याने तिवसा येथे सचिन श्रीखंडकर स्मारक जवळ बेमुदत साखळी उपोषण सोमवार पासून प्रारंभ झाला आहे.तिवसा नगरपंचायत हद्दीतील मंजूर अभियानातील एकूण जागे पैकी १०% जागा भाडेकरारावर देण्याबाबत चा निर्णय घेतला असताना एवढे दिवस उलटूनही प्रकरण प्रलंबित ठेवत असल्याचे दिसत आहे.यामुळे न्यायमिळवण्यासाठी व शेत सर्वे नंबर २९०/०३ २९१/२आ २९१/३अ मंजूर अकृषक लेआऊट मधील शासनाने दि.१८ जून २०२४ रोजी चे आदेशानुसार मान्यता देण्यात होती मात्र भाडे कराराबाबत चे धोरण अवलंबिले नाही यामुळे आता प्रश्न निकाली काढण्यासाठी वाचनालयाचे हितचिंतक यांनी साखळी उपोषणाचा मार्ग अवलंबीला असून साखळी उपोषणातून मार्ग न निघाल्यास उपोषणाचे रूपांतर आमरण होणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे.तिवसा येथील उपोषणकर्त्यांनी दिला आहे.या उपोषणाला तिवसा तालुक्यातील अनेक संघटनानी पाठिंबा दिला आहे.

# पुस्तकांमुळे मराठीला अभिजात भाषेचा दर्जा - प्राचार्य कुबडे

## महावाचन उत्सव : जिल्हास्तरीय ग्रंथालय प्रदर्शन व पुस्तक मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९अमरावती**

समग्र शिक्षा शिक्षण विभाग जिल्हा परिषद अमरावती द्वारा जिल्हा परिषद माध्यमिक मुलींची शाळा(गर्ल्स हायस्कूल) अमरावती येथे दिनांक ९ऑक्टोंबर रोजी महावाचन उत्सव, जिल्हास्तरीय ग्रंथालय प्रदर्शन व पुस्तक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनीचे उद्घाटन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य मिलिंद कुबडे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी अध्यक्षस्थानी जिल्हा परिषदेचे शिक्षणाधिकारी (योजना) निखिल मानकर हे होते.

या कार्यक्रमाला शिक्षणाधिकारी(प्राथमिक) बुध्दभूषण सोनोने, ज्येष्ठ अधिव्याख्याता पवन मानकर, उपशिक्षणाधिकारी दीपक कोकतारे, गटशिक्षणाधिकारी तथा जिल्हा परिषद कन्या शाळा अमरावतीचे मुख्याध्यापक डी.एन.वानखडे, प्रशासन अधिकारी राजेश वरखडे , सहायक कार्यक्रम अधिकारी संगीता सोनोने पर्यवेक्षक एस.एस परळकर आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.




उद्घाटकीय मार्गदर्शन करतांना मिलिंद कुबडे यांनी ज्ञानार्जनसाठी पुस्तकांची भूमिका मोलाची ठरते. मराठी भाषेला समृध्द करण्याचे कार्य पुस्तकांनी केले आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यात पुस्तकांची भूमिका महत्वाची आहे. मोबाईलमुळे पुस्तकांची घुसमट होत आहे. कपाटात पुस्तकांनी आत्महत्या करण्याची वेळ आली आहे. हे टाळण्यासाठी विद्यार्थ्यांनी कपाट उघडणे गरजेचे असल्याचे मत श्री कुबडे यांनी व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात शिक्षणाधिकारी निखिल मानकर यांनी खाऊच्या पैशातून एक तरी पुस्तक खरेदी करण्याचे मत व्यक्त केले. ज्येष्ठ अधिव्याख्याता पवन मानकर यांनी पुस्तक व ग्रंथालयमुळे व्यक्तीसह घराची समृध्दी होते. प्रत्येकानी पुस्तक वाचनाचा छंद जोपासण्याचे आवाहन त्यांनी केले.

यावेळी आयोजित ग्रंथप्रदर्शन मध्ये जिल्ह्यातील ज्ञानमाता हायस्कूल अमरावती, कस्तुरबा कन्या शाळा अमरावती, वेध प्रकाशन , जिल्हा परिषद शाळा शहापूर (पं.स.नांदगाव खंडेश्वर), जिल्हा परिषद शाळा शेलू नटवा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वाढोना (पं.स. अचलपूर ), जिल्हा परिषद कन्या शाळा (गर्ल्स हायस्कूल) अमरावती, हॉलिक्रॉस हायस्कूलअमरावती, शिवाजी बहुउद्देशिय माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा अमरावती, जिल्हा परिषद मुलांची शाळा (सायंस्कोर) अमरावती, गणेशदास राठी विद्यालय अमरावती, जिल्हा परिषद उर्दु कन्या शाळा, अमरावती आदींनी सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राथमिक शिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने यांनी केले. संचालन बाळकृष्ण आंधळे, आभार संगीता सहायक कार्यक्रम अधिकारी सोनोने यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दिलीप आठवले, ममता गुर्जर, प्रवीण चव्हाण, फरहिन कौसर, अमोल दानखेडे, वीरेंद्र ब्राम्हण व शाळेतील शिक्षक वृंदानी परिश्रम घेतले.

# पोस्ट कार्यालयाने सुरू केली सुविधा



## आता परदेशातही पाठवा घरचा दिवाळी फराळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

दिवाळी सण अगदी काहीदिवसांवर येऊन ठेपला आहे. देशभरातच नव्हे तर जगभरात हा सण साजरा केला जातो. दिवाळी म्हटले की, गोडधोड पदार्थ, फराळाची मजा काही औरच असते. अशावेळी परदेशात वसलेल्या महाराष्ट्रीयन अथवा भारतीय नागरिकांना फराळाची प्रामुख्याने आठवण होते. आपल्याजवळच्या नातेवाइकांनाही काही पाठवावे वाटते. अशा नागरिकांना आता पोस्ट विभागाने विशेष सुविधा उपलब्ध करून दिली असून, जगाच्या पाठीवर चंद्रपूर पोस्ट कार्यालयातून फराळ पाठवता येणार आहे.नातेवाइकांना लाडू, चिवडा, चकल्या, करंज्या यांची चव थेट विदेशात चाखता येणार आहे.

जगात कुठेहीजिल्ह्यातील बरेचसे तरुण- तरुणी विविध देशांत कार्यरत आहेत.त्यांच्यापर्यंत दिवाळीचा फराळ कसा पाठवायचा, हा मोठा प्रश्न त्यांच्या नातेवाइकांसमोर असतो. याचे उत्तर डाक विभागाने शोधून काढले आहे. डाक विभागाने यासाठी सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जगात कुठेही नातेवाइकांना फरार पाठविता येणार आहे.

**माफक दरात सुविधा**

काही खास पोस्ट ऑफिसेसमध्ये फराळाचे वाजवी दरात सुरक्षित पॅकेजिंग आणि विशेष बुकिंग काऊंटर सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. डाक विभागाच्या स्पीड पोस्ट, रजिस्टर पोस्ट, आवटीपीएस या विविध आंतरराष्ट्रीय मेल सेवा उपलब्ध असून, या सेवांचे दर खासगी कुरिअर कंपन्यांच्या दरापेक्षा बरेच कमी आहेत. सोबतच जलद सेवा आणि डाक विभागाची विश्वसनीयता ही डाक विभागाच्या सेवेची वैशिष्ट्ये आहेत.

# प्रहार अपंग क्रांतीचा तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या दालनासमोर ठिय्या

## विविध घोषणांनी दणाणून गेला परिसर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

प्रहार क्रांतीच्या वतीने चंदू खेडकर यांच्या नेतृत्वात अमरावती तहसील कार्यालय येथे मोर्चा आणण्याच्या संदर्भात निवेदन दिले मात्र तहसीलदार कार्यालयाने संबंधित दिलेल्या निवेदनाला पाठ फिरवली त्याचा निषेध म्हणून आज तहसील कार्यालयात तहसीलदार यांच्या दालनासमोर ठिय्या आंदालनाचे आयोजन करण्यात आले






अमरावती शहरातील निराधार अपंग योजना राबवण्याकरिता संजय गांधी निराधार तहसीलदार हे कायमस्वरूपी पद असून सुद्धा तिथे कार्यरत असलेले जबाबदार अधिकारी अपंगांची हेडसाड करतात शासनाचे परिपत्रक असताना सुद्धा अपंग बांधवांना त्रास देणे वृद्धांना कायद्याच्या तरतुदीत असताना मुलांचे प्रतिज्ञापत्र मागवणे अशा विविध समस्या निर्माण करून दलालांच्या माध्यमातून तिथे उपस्थित त्यांनी नेमलेल्या लोकांच्या माध्यमातून केल्यास काम सहज होऊ शकते मात्र प्रचंड पैशाची मागणी केल्या जाते याबाबतीत वारंवार आम्ही निवेदन दिले प्रत्यक्ष भेटलो परंतु कुठली कारवाई न झाल्यामुळे याचे नियोजन केले दोन आठवडे आधी पत्र दिले मात्र त्यालाही प्रतिसाद न दिल्यामुळे आज तहसीलदार यांच्या कार्यालयासमोर प्रत्यक्ष या आंदोलन केले जिथपर्यंत संबंधित जबाबदार अधिकाऱ्यांवर कर्मचाऱ्यांवर कारवाई होत नाही तिथपर्यंत आम्ही उठणार नाही अशा प्रकारची ताठर भूमिका चंदू खेडकर यांनी घेतली सदर होती.

या ठिय्या आंदोलन चंदू खेडकर शाम राजपूत कमलेश गुप्ता रितेश शर्मा आशुतोष सावरकर चेतन गाडेकर मंगेश मानके भीमराव वानखडे दीपक बोबडे करुणा बोबडे कांचन मीना अंजली ताई देशमुख हर्षा भोयर अतुल जयसिंगपूर निर्मला कोठार जितू पाटील चव्हाण नमिता गंगात्रे पंकज सोनटक्के कोठार मुक्तागंगात्रे श्यामलाल गुप्ता निदानास शेख जमीर ज्ञानेश्वर प्रकाश गुरुदे सहभागी झाले होते.

# स्विप कार्यक्रमांतर्गत उपक्रमाला भातकुली पंचायत समितीत सुरूवात : विधानसभा निवडणूक२०२४ची जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ भातकुली**

पंचायत समिती भातकुली मध्ये स्विप कार्यक्रमांतर्गत नियोजनानुसार प्रत्येक शाळेत ऑक्टोबर महिन्यात उपक्रम रावविण्यात यावे व उपक्रमांचा फोटोसह अहवाल केंद्रप्रमुखांमार्फत कार्यालयात सादर करावा असे आदेश भातकुली पं.स.चे गटशिक्षणाधिकारी तथा तालुका नोडल अधिकारी बडनेरा मतदार संघ दिपक कोकतरे यांनी दिले आहे.आगामी विधानसभा निवडणूक २०२४ची मतदान जनजागृती करीता शाळेतून हे उपक्रम राबविण्यात येत आहे.




या उपक्रमातंर्गत चित्रकला/पोस्टर स्पर्धानिबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, मतदान करा याविषयी पालकांना विनंती पत्र,पालक सभा (जनजागृती), नियमित मतदान करणा-या पालकांच्या मुलाखती, मतदान शपथ, पथनाटय, प्रभात फेरी,सायकल रॅली विद्यार्थ्यांसाठी, वाईक रॅली शिक्षकांसाठी, पिंक फोर्स रॅली असे उपक्रमस्विप कार्यक्रमांतर्गत ऑक्टोबर महिन्यातील उपक्रम राबविण्यात यावे. व अहवाल केंद्रप्रमुखां मार्फत पं.स.कार्यालयात सादर करावा असे आदेश गटशिक्षणाधिकारी यांनी दिले आहे. स्वीप कार्यक्रम राबविण्या करीता भातकुली तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.या समितीचे प्रमुख गटशिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी बडनेरा विधानसभा मतदार संघाचे दिपक कोकतरे असुन सद् स्य म्हणुन कु.शीतल राठोडमंडल अधिकारी,कु.एस.एस. उईके,तलाठी!सारिका सोळंके,तलाठी,सौ निता सोमवंशी,केंद्रप्रमुख गणोरी,सुनिल पांडे केंद्रप्रमुख खारतळेगाव, किशोर रुपनारायण,केंद्रप्रमुख आसरा,शैलेंद्र दहातोंडे केंद्रप्रमुख भातकुली,रविंद्र धरमठोक,केंद्रप्रमुख वाठोडा शु.जानरावजी सुलताने,केंद्रप्रमुख आष्टी,अशोक पवार केंद्रप्रमुख टाकरखेडा,राजेश सावरकर, स.शि.जि.प.शाळा उत्तमसरा,लखन जाधव, स.शि. जि.प.शाळा खोलापूर मुले,कु.सुजाता सोनवणेविषय साधन व्यक्ती गटसाधन केंद्र भातकुली यांचा समावेश आहे.

# वंचित बहुजन आघाडीने उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

## प्रकाश आंबेडकरांनी दहा उमेदवार केले जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

महायुती आणि महाविकास आघाडीचा जागावाटपांचा तिढा सुरू असतानाच इकडे प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील वंचित बहुजन आघाडीने उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. प्रकाश आंबेडकर तिसऱ्या आघाडीत सामील होणार का? अशीच चर्चा होत असतानाच वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीसाठी दहा उमेदवार जाहीर केले आहेत. यात राज्यातील वेगवेगळ्या विभागातील मतदारसंघांचा समावेश आहे.



वंचित बहुजन आघाडीने दहा जणांना उमेदवारी जाहीर केली आहे. यात औरंगाबाद मध्य (छत्रपती संभाजीनगर मध्य), कल्याण पश्चिम, परभणी, हडपसर, मान, सांगली या महत्त्वाच्या मतदारसंघाचाही समावेश आहे.

मलकापूर विधानसभा मतदारसंघ - शहजाद खान सलीम खान (मुस्लीम)

बाळापूर विधानसभा मतदारसंघ - खातीब सयद नातीक्काद्दीन (मुस्लीम)

परभणी विधानसभा मतदारसंघ - सयद सामी सय साहेबजान (मुस्लीम)

औरंगाबाद मध्य मतदारसंघ - मोहम्मद जावीद मोहम्मद इसाक (मुस्लीम)

गंगापूर विधानसभा मतदारसंघ - सय्यद गुलाम नबी सय्यद (मुस्लीम)

कल्याण पश्चिम मतदारसंघ - अयाज गुलजार मोलवी (मुस्लीम)

हडपसर विधानसभा मतदारसंघ - मोहम्म अफरोज मुल्ला (मुस्लीम)

मान विधानसभा मतदारसंघ - इम्तियाज जफर नदाफ (मुस्लीम)

शिरोळ विधानसभा मतदारसंघ - आरिफ मोहम्मदाली पटेल (मुस्लीम)

सांगली विधानसभा मतदारसंघ - अल्लाउद्दीन हयातचंद काझी (मुस्लीम)

वंचित बहुजन आघाडीला सोबत घेण्याचा प्रयत्न लोकसभा निवडणुकीवेळी झाला होता. मात्र, सन्मानजनक जागा दिल्या जात नसल्याने वंचित बहुजन आघाडीने लोकसभा निवडणूक स्वतंत्र लढवली होती. लोकसभेत चांगली कामगिरी वंचितला करता आली नाही.

आता वंचित बहुजन आघाडीने विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. विधानसभा निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर होण्याआधीच वंचितने २१ उमेदवार जाहीर केले आहेत. पहिल्या यादीत वंचितने ११ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत.

# गरबा, ढोबरी, जगराता, ढोल-ताशांनी दुर्गोत्सवाचे लक्ष वेधले

## प्राचीन परंपरांसह नवीन परंपरांची जोडअमरावतीच्या दुर्गोत्सवाला सांस्कृतिक उत्सवांनी घातली भर, भाविकांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.९ अमरावती**

स्थानिक दुर्गोत्सवाला अधिक इव्हेंटपूर्ण बनविण्यासाठी प्रत्येक मंडळाकडून प्रयत्न करण्यात आले. यातूनच अनेक मंडळांनी गरबा या आधुनिक प्रकाराला मंडळात समाविष्ट केले. त्यावर विविध पुरस्कार जाहीर करीत इव्हेंट केला, तर काही राजकीय पक्षांनी आणि पतसंस्थासोबतच सामाजिक कार्यकर्त्यांनी तसेच मंडळांनी रिल्सला निमंत्रित करून देखाव्यातील उत्सवात भर घातली. यामध्ये परंपरागत ढोबरी नृत्य सादर झाले. जगराता, दंडार, बंजारा, ढेमसा है आदिवासी नृत्य यावेळी सादर होत आहेत.



अमरावती च्या दुरगोत्सवालाशतकाची परंपरा लाभली आहे. काळानुसार या उत्सवाला व्यापक रूप प्राप्त झाले. यासोबतच प्रत्येक मंडळाने नवीन आणि जुन्या परंपरांना सोबत पुढे नेण्याचे काम हाती घेतले आहे. यातून प्रत्येक मंडळात आवर्जून गरबा नृत्य हा इव्हेंट पाहायला मिळत आहे.

पूर्वी केवळ ठराविक मंडळातच गुजराती गरबा नृत्य सादर करीत होते. आता शहरातील प्रमुख मंडळांसह काही राजकीय पक्ष, बँका, पतसंस्था आणि शाळा, महाविद्यालयातही गराब स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यातून ड्रेस डिझायनर आणि विविध दागिन्यांची बाजारातून खरेदी वाढली आहे. या उत्सवाकरिता टिपऱ्यांना रंगकाम करीत दुर्लक्षित समाजाने या टिपऱ्या उत्सवासाठी बाजारात आणल्या आहेत. कोरिओग्राफरच्या मदतीने महिन्याभरापासून नृत्य सादरीकरणाचे धडे घेतले आत आहेत. छोट्यांपासून ज्येष्ठ महिलांपर्यंत अनेकांनी या गरवा नृत्यात सहभागनोंदविला आहे.पंचमी, सप्तमी आणि अष्टमीला परंपरागत ढोबरी नृत्य सादर केले जाते. यासाठी हातात दिवे घेऊन नृत्य सादर केले जाते. हे परंपरागत नृत्य पाहण्यासाठी अनेकांची उत्सवात गर्दी पाहायला मिळते. यानंतर देवीचा गोंधळ संबळावर सादर केला जातो. आईचा जोगवा सादर करण्याची प्रथा यात आहे. हे परंपरागत प्रकार शहरातील ज्येष्ठ मंडळात सादर केले जात आहेत. नवीन पिढीसाठी हा प्रकार नवा आहे.

ग्रामीण आणि शहरी भागात आदिवासी ढेमसा नृत्य, परंपरागत नृत्य प्रकार, बंजारा नृत्य आणि टिपाऱ्यांच्या तालावर थिरकणारी तरुणाई या उत्सवात पाहायला मिळत आहे, तर काही मंडळांनी भजनांचे आयोजन केले आहे. सेलिब्रिटी रिलस्टारला उत्सवात बोलविण्याचा प्रकार यावर्षी पाहायला मिळत आहे. अनेक मंडळांनी अशा रिलस्टार्सला बोलावले. यातून दुर्गोत्सवाला पाहण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी पाहायला मिळत आहे.

# सावधान! सोयाबीन उडीद झाकून ठेवा, आजपासून पावसाचा जोर वाढणार, कोणत्या भागात कधीपर्यंत पडणार पाऊस?

**विदर्भ प्रजासत्ताक दि.९ अमरावती**

राज्याच्या विविध भागात परतीच्या पावसानं (ठळप) धुमाकूळ घातला आहे. अनेक ठिकाणी नदी नाले दुथडी भरुन वाहत आहेत. तसेच ज्या भागात अतिवृष्टी झालीय, त्या भागात शेती पिकांना मोठा फटका बसला आहे. दरम्यान, हा परतीचा पाऊस आणखी किती दिवस राहणार? याबाबतची माहिती हवामान अभ्यासक पंजाबराव डख यांनी दिली आहे. ते नेमकं काय म्हणालेत ते पाहुयात.

**शेतकऱ्यांनी सावधानता बाळगावी**

पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, आजपासून राज्याच्या विविध भागात पुन्हा पावसाचा जोर वाढणार आहे. ९ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबरपर्यंत राज्यात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता डख यांनी वर्तवली आहे. या पावसाच्या पार्श्वभूमीवर पंजबराव डख यांनी शेतकऱ्यांना सावधानतेचा इशारा दिला आहे. ज्या शेतकऱ्यांनी सोयाबीन, उडीद काढला आहे किंवा केला आहे, त्या शेतकऱ्यांनी ते झाकून ठेवावे, अन्यथा पावसाचा फटका बसू शकतो. सध्या बऱ्याच शेतकऱ्यांच्या या पिकांच्या काढणी सुरु आहेत. अशातच पाऊस आल्यास शेती पिकांना फटका बसण्याची शक्यता आहे.



**या भागात होणार जोरदार पाऊस**

पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, आजपासून मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण या भागात रोज भाग बदलत विजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. तर १२ ऑक्टोबरपासून विदर्भात पावसाला सुरुवात होणार असल्याचे डख म्हणाले. १२ ते १६ ऑक्टोबर या काळात विदर्भात जोरदार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. डखांमनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेड, परभणी,स हिंगोली, लातूर, बीड, जालना या सहा जिल्ह्यांमध्ये जास्त पावसाची शक्यता आहे. तर पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, नगर, नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव या जिल्ह्यातही पावसाचा जोर अधिक राहणार असल्याची शक्यता आहे.

**गहू आणि हरभरा पिकांसाठी परतीचा पाऊस ठरणार वरदान**

दरम्यान, पंजाबराव डख यांनी दिलेल्या माहितीनुसार, परतीचा पाऊस हा गहू आणि हरभरा पिकांसाठी वरदान ठरणार आहे. रब्बी हंगामात मोठ्या प्रमाणात गहू आणि हरभरा या पिकांचं उत्पादन घेतलं जातं. हा परतीचा पाऊस दोन पिकांसाठी फायदेशीर असल्याचे डख म्हणाले. मात्र, दुसऱ्या बाजूला परतीच्या पावसाची अनेक ठिकाणी शेती पिकांना मोठा फटका बसत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सोयाबीन, उडीद, भाजीपाला, तूर, कांदा या पिकांचं नुकसान झालं आहे.

# आग्या मोहळ जाळायला रविकांत तुपकर यांच्या हाती मशाल; पत्नी शर्वरीही निवडणुकीच्या रिंगणात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ९ बुलढाणा**

राज्यातील विधानसभा निवडणुकांची रणशिंग पुढील काही दिवसांत फुंकले जाणार असून राजकीय पक्षांसह अपक्ष आणि मतदारसंघातील इच्छुक नेतेही कामाला लागले आहेत. आपल्या मतदारसंघातून निवडणूक लढवण्यासाठी कोणत्या पक्षाकडून आपणास तिकीट मिळेल, कोणत्या पक्षातून विजयी होण्याची जास्त शक्यता आहे, या सर्वांचा अभ्यास करुन उमेदवारही पक्षांतर करताना दिसून येतात. बुलढाण्यातील शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी मातोश्रीवर जाऊन उद्धव ठाकरेंची घेतली. याबाबत, आता त्यांच्या पत्नी शर्वरी तुपकर यांनीच माहिती दिली आहे. मात्र, दोघांमध्ये काय चर्चा झाली, याची माहिती नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

रविकांत तुपकर यांनी उद्धव ठाकरेंची भेट घेतली असून महाविकास आघाडीच्या नेत्यांसोबत त्यांची बैठक झाल्याची बुलढाण्यातील राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे. तसेच, रविकांत तुपकर यांच्या पत्नी ॲड. शर्वरी तुपकर याही निवडणूक रिंगणात उतरणार असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याबाबत, एबीपी माझाने शर्वरी तुपकर यांच्यासमवेत संवाद साधला. ''काल शेतकरी नेते रविकांत तुपकर यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतल्यावर आज बुलढाण्यात उत्साहाच वातावरण बघायला मिळालं. काल महविकास आघाडीने



रविकांत तुपकर यांना पाठिंबा दिल्यास चांगलच होईल, असं मत रविकांत तुपकर यांच्या पत्नी शर्वरी तुपकर यांनी व्यक्त केलंय. तसेच, उद्धव ठाकरे यांना भेटल्याची माहिती आहे, मात्र भेटीत काय चर्चा झाली याचा तपशील मला कळलं नाही. महविकास आघाडीने रविकांत यांना पाठिंबा दिला असेल तर नक्कीच चांगल होईल. आज कार्यकर्ते उत्साहात आहेत, बुलढाणा मतदारसंघात जनतेला बदल हवाय, त्यामुळे कार्यकर्ते खुश आहेत आणि कामाला लागले आहेत, असेही शर्वरी यांनी म्हटलं. बुलढाण्यात आग्या मोहोळ उठवायला रविकांत तुपकर यांच्या हाती मशाल.. अशा घोषणा आता कार्यकर्ते देत आहेत. मात्र, मी विधानसभा निवडणूक लढवावी का हे माझे सहकारी व शेतकरी ठरवतील, तेच तसा निर्णय घेतील, असेही शर्वरी तुपकर यांनी बोलताना स्पष्ट केले.

**लोकसभेला रविकांत यांना अडीच लाख मतं**

बुलढाणा विधानसभा मतदारसंघात रविकांत तुपकर यांना महाविकास आघाडी कडून उमेदवारी मिळण्याची शक्यताही वर्तविण्यात येत आहे. तर आगामी काळात रविकांत तुपकर हे महाराष्ट्र दौरा करत असून जवळपास २५ जागांवर उमेदवार देण्याची त्यांनी तयारी दर्शवली आहे. लोकसभेला बुलढाणा मतदारसंघातून रविकांत तुपकर हे अपक्ष म्हणून उभे राहिले होते. यावेळी त्यांचा निवडणुकीत पराभव जरी झाला असला तरी त्यांनी जवळपास अडीच लाख मत घेतली होती. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत मत विभाजन आणि नुकसान टाळण्यासाठी रविकांत तुपकर यांना सोबत घेण्याच्या दृष्टिकोनातून महाविकास आघाडीत सकारात्मक चर्चा होत असल्याची माहिती आहे.